## लालबागच्या राजाचे भक्तांच्या जनसागरात विसर्जन



**मुंबई :** लालबागच्या राजाच्या विसर्जन रविवारी (दि.७) रात्री ९ वाजता करण्यात आले आहे. लालबागचा राजा रविवारी सकाळी ८ वाजता गिरगाव चौपाटीवर दाखल झाला होता. त्यापूर्वीच अरबी समुद्राला भरती आल्याने विसर्जनात अडथळा निर्माण झाला होता. अखेर १२ तासानंतर रात्री साडे आठच्या सुमारास ओहोटी सुरू झाल्याने लालबागच्या राजाच्या विसर्जनाची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आणि विसर्जन करण्यात आले. बारा तासांचा वेळ झाला तरी लालबागच्या राजाच्या भक्तांचा गिरगाव चौपाटीवरील उत्साह मात्र कायम होता.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ५१
www.ramprahar.com

सोमवार, ८ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


जांभूळपाड्यात विजेचा शॉक लागून चार जनावरांचा मृत्यू/५

उरणमध्ये भातपिकांना सुरळीच्या अळीचा धोका/६

इंदापूर बाजारपेठेत भीषण आग; तीन दुकाने जळून खाक/७


# स्वकष्टाने मेहनत करून ज्येष्ठता मिळवा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन | वावर्ले येथे रक्तदान शिबिर






**चौक : प्रतिनिधी**

स्वकष्टाने मेहनत करून, समाजाचे काम करा, गोरगरीब जनतेला समजून घेऊन त्यांना मदत करा, आपल्या वयाने नाहीतर कार्याने आपली ज्येष्ठता सिद्ध करा, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वावर्ले येथे रक्तदान शिबिरावेळी केले. दानशूर व्यक्तिमत्व, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी (दि.७) रक्तदान शिबिर उपक्रम राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चा खालापूर मंडळाच्या वतीने रविवारी खालापूर तालुक्यातील वावर्ले येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. याशिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या शिबिरावेळी आमदार महेश बालदी म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमिताने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील रक्त तुटवडा भरून काढण्यासाठी एक विशेष रक्तदान शिबिरा बरोबर रोजगार मेळावा, महा रोजगार मेळावा, तसेच आदिवासी मुलांना शाळेत जाण्यासाठी बसची सुविधा उपलब्ध करून दिली असून आणखी एक बस उपलब्ध होणार असल्याचे सांगितले तर या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

दर महिन्याच्या पहिल्या रविवारी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे. हा उपक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असून, विशेषतः थैलेसिमियाग्रस्त रुग्णांसाठी आणि इतर गरजू रुग्णांसाठी या रक्तदान उपक्रमाचे मोठे योगदान ठरणार आहे. आतापर्यंत पनवेल, खारघर आणि खांदा कॉलनी येथे हे शिबिर यशस्वी आयोजन करण्यात आल्याचे भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी सांगितले.

वावर्ले येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसादात लाभला. एमजीएम हॉस्पिटल कामोठे व सखा फाऊंडेशन मेडिकल पनवेल यांच्या सहयोगाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी आमदार देवेंद्र साटम, भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, उद्योग आघाडीचे जिल्हा अध्यक्ष विठ्ठल मोरे, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, खालापूर पूर्व मंडळ अध्यक्ष सानी यादव, माजी मंडल अध्यक्ष रामदास ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, ज्येष्ठ नेते अरुण पारठे, नितीन तवले, मनोज पारठे, निखिल पाटील, भरत मांडे, स्वप्निल ठोंबरे, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, माजी सरपंच अरुण पारठे, प्रवीण जांभळे, गणेश कदम, गणेश मुकादम, प्रसाद पाटील, नागेश पाटील, प्रणित सांगळे, विशाल लोते, प्रसाद देशमुख, मयूर पाटील, विकास रसाळ, लवेश कर्णूक, राजेश पारठे, स्वप्नील पारठे, शहाजी पाटील, कृष्णा पारठे, मनोहर कडू यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

#### नागरिकांचा उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

युवा नेते मनोज पारठे यांनी या रक्तदान शिबिराचे आयोजन केले असून शहाजी पाटील, रमेश भद्रिके, प्रदोष भद्रिके, स्वप्नील पारठे, महेश चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरामध्ये ७७ जणांनी रक्तदान केले तसेच २०० हून अधिक नागरीकांनी आरोग्य तपासणी केली.

## ओबीसी समाजाच्या मागण्या पूर्ण करू

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आश्वासन

**पुणे : प्रतिनिधी**

मराठा आरक्षण देताना आम्ही ओबीसींना कोणताही धक्का लावला नाही, मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र न देता ज्यांची कुणबी नोंद सापडली आहे त्यांनाच फक्त आरक्षणाचा लाभ मिळणार आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. ओबीसी समाजाच्या विकासासाठी सरकार कटीबद्ध असून त्यांनी मागत राहावे, आम्ही शक्य तेवढे देत राहू असे आश्वासनही त्यांनी दिले. पुण्यातील पुरंदर तालुक्यातील भिंवडी येथे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी शासकीय जयंती सोहळा कार्यक्रम झाला. या वेळी देवेंद्र फडणवीसांनी हे वक्तव्य केले.



मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहणार नाही, ओबीसींच्या ताटातील काढून घेऊन सरसकट प्रमाणपत्र देणार नाही. काहीही झाले तर ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. ओबीसींकरता योजना करणारे हे सरकार आहे असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही. इंग्रजांनी जे केले ते आम्ही करणार नाही. मराठा आरक्षण देताना ओबीसींना धक्का लागणार नाही. मराठावाड्यात १९४८ पर्यंत इंग्रज राज्य नव्हते, तर निजाम राज्य होते. मराठवाड्याचे रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. आता ज्यांच्याकडे नोंद असेल त्याला प्रमाणपत्र दिले जाईल, असे आपण सांगितले आहे.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, ओबीसींना जोपर्यंत मुख्य प्रवाहात आणणार नाही त्यावर त्याचा विकास होणार नाही. ओबीसी विकास होईपर्यंत शिवकार्य पूर्ण होऊ शकत नाही. कोणीही मनात शंका घेऊ नका. समाजाने मागण्या केल्या तर आम्ही मागण्या पूर्ण करू. तुम्ही मागत राहा, आम्हाला शक्य आहे तेवढे देत जातो.

यासोबतच ते कार्यक्रमाविषयी म्हणाले की, समाज पाठीमागे राहणार नाही यासाठी राजे उमाजी नाईक महामंडळ स्थापन केले. त्यामाध्यमातून १५ लाखांपर्यंत कर्ज द्या, दोन लाखांपर्यंत बिगर तारण कर्ज देण्यात येईल. हा समाज नोकरी देणारा झाला पाहिजे. महाज्योतीमधून स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## मराठा आरक्षणाबाबत मोठा निर्णय

### आत्महत्या केलेल्या २१ कुटुंबांना प्रत्येकी १० लाखांची मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासंबंधी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. मराठा आरक्षण आंदोलनाशी संबंधित अत्यंत संवेदनशील निर्णयात, महाराष्ट्र सरकारने आत्महत्या केलेल्या २१ जणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. या निर्णयानंतर, या कुटुंबियांना एकूण दोन कोटी १० लाख रुपये दिले जातील.

सरकारचे हे पाऊल केवळ आर्थिक मदत देत नाही तर संवेदनशीलता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देखील देते. आरक्षणाच्या मागणीसाठी जीव गमावलेल्या लोकांच्या कुटुंबियांच्या वेदना समजून घेण्याचा आणि त्यांना पाठिंबा देण्याचा हा प्रयत्न राज्यासाठी एक महत्त्वाचा आदर्श ठरला आहे. आंदोलनादरम्यान ज्या कुटुंबांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांना बाजूला केले जाणार नाही. सरकार त्यांच्या दुःखात त्यांच्यासोबत उभे राहील, असे सरकारने म्हटलं आहे.

## निवडक

### राज्यात विसर्जन मिरवणुकीला गालबोट, १५ जणांचा मृत्यू

**मुंबई :** महाराष्ट्रामध्ये विविध जिल्ह्यांमध्ये घडलेल्या दुर्घटनांमध्ये एकूण १५ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ६ जण अद्याप बेपत्ता आहेत आणि ७ जण जखमी झाले आहेत. पुण्यात चार, अमरावतीमध्ये तीन, शहापूरमध्ये तीन, नांदेडच्या गाडेगावमध्ये दोघांचा सुरू आहे. मुंबईमध्ये एक, अकोल्यामध्ये एक, जळगावमध्ये एक तरुण, नाशिकमध्ये तीन असे मयत झाले आहेत.

### उद्यापासून आशिया चषक क्रिकेट स्पर्धा

**अबुधाबी :** आशिया चषक टी २० क्रिकेट स्पर्धा मंगळवार ९ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होत आहे. अफगाणिस्तान विरुद्ध हॉंगकॉंग या सामन्याने स्पर्धेची सुरुवात होणार आहे. भारताचा पहिला सामना बुधवार १० सप्टेंबर रोजी आहे. संयुक्त अरब आमिराती अर्थात यूएई विरुद्ध भारताचा पहिला सामना होणार आहे.

## पुढील पाच दिवस राज्यात उघडीप?

**पुणे :** राज्याच्या काही भागात पाऊस सुरू आहे तर काही भागात पावसाने उघडीप दिली आहे. पुढील पाच दिवस राज्यातील हवामान कसं असेल? याबाबतची माहिती हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे. पुढील पाच दिवस राज्यात उघडीप राहणार असल्याचे खुळे म्हणाले.

संपूर्ण मराठवाडा, खान्देश, नाशिक अहिल्यानगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर जिल्ह्यांत गुरुवार ११ सप्टेंबरपर्यंत पावसाची काहीशी उघडीप मिळण्याची शक्यता जाणवते. मुंबईसह कोकणात व विदर्भात मात्र ही उघडीप परवा मंगळवा, ९ सप्टेंबरपासून जाणवेल असे खुळे म्हणाले. मुंबईसह संपूर्ण कोकण व मराठवाडा वगळता उर्वरित संपूर्ण विदर्भ, खान्देश व नाशिक अहिल्यानगर पुणे सातारा सांगली, कोल्हापूर, सोलापूर अश्या २१ जिल्ह्यांत शुक्रवार १२ सप्टेंबरपासून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता जाणवते. मुंबईसह संपूर्ण कोकण व मराठवाड्यातील १५ जिल्ह्यात मात्र ह्या दिवसात केवळ तुरळक ठिकाणी मध्यमच पावसाची शक्यता जाणवते.

## ओबीसी आणि मराठा आरक्षणावर राज्य सरकार ठाम –मंत्री बावनकुळे

**नागपूर : प्रतिनिधी**

लोकशाहीत प्रत्येकाला न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. ओबीसी पदाधिकारी न्यायालयात जात असतील तर तो त्यांचा अधिकार आहे, मात्र सरकारही न्यायालयात ठामपणे आपली बाजू मांडणार आहे, असे मत महसूल मंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. नियोजन भवन येथे प्रसारमाध्यमांशी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते.

बावनकुळे म्हणाले, ओबीसी संघटनांना आंदोलनाचा अधिकार आहे, परंतु कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही. मराठा व ओबीसी आरक्षणासाठी उपसमिती कार्यरत असून तिच्या शिफारशींमुळे सामाजिक सलोखा अबाधित राहील. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही राजकीय बाऊ न करता उपसमितीकडे आपली बाजू मांडावी, असे आवाहन त्यांनी केले.

जीएसटीवरील निर्णयांबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, मध्यमवर्गीय कुटुंबांना आवश्यक वस्तूंवरील जीएसटी कमी करण्याचे मोठे पाऊल पंतप्रधान मोदींनी उचलले असून त्याचा थेट लाभ सामान्यांना मिळणार आहे. जाहिरात वादावर त्यांनी प्रत्युत्तर देताना सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामगिरीबद्दल जाहिरात दिली तर त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना जाहिरातींवर प्रचंड खर्च झाला, त्याचा हिशोब का काढला जात नाही?

## पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांचे निलंबन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांचे जाणीवपूर्वक अक्षम्य दुर्लक्ष करून कलम ६३ एक अ मधील तरतुदींचा भंग करून सदर जमिनीना अकृषिक सनद देण्याची अनियमितता केल्याचा ठपका ठेवत निलंबन करण्यात आले आहे.

मेरेथॉन पनवेल इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी पनवेल तालुक्यातील मौजे वारदोली, पोयंजे, भिंगारवाडी, भिंगार, पाली बुद्रुक व मौजे भेरले येथील जमिनी या महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक–अ मधील तरतूदीन्वये खऱ्या खुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी सन २००७ मध्ये खरेदी केल्या होत्या, त्यामुळे सदर जमिनीवर कलम ६३ एक–अ मधील तरतूदीन्वये कार्यवाही करणे अपेक्षित असताना तहसीलदार विजय पाटील यांनी या बाबीकडे जाणीवपूर्वक अक्षम्य दुर्लक्ष करुन कलम ६३ एक अ मधील तरतुदींचा भंग करुन सदर जमिनीना अकृषिक सनद देण्याची अनियमितता केल्याचा ठपका ठेवत विजय पाटील यांचे निलंबन करण्यात आले आहे. पाटील यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३चे उल्लंघन करणारी असल्याने हे निलंबन करण्यात आले आहे.

प्रस्तुत आदेश अंमलात असेपर्यंत विजय पाटील, यांचे निलंबन कालावधीतील मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे असेल व त्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्या पूर्व संमत्तीशिवाय मुख्यालय सोडता कामा नये असे या आदेशात म्हटले आहे.

# रायगडात ढोल ताशाच्या गजरात गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप

**अलिबाग : प्रतिनिधी**

भव्य मिरवणूका, गुलालाची उधळण, संगीताच्या तालावर थिरकणारी तरूणाई आणि गणपती बाप्पा मोरयाचा अखंड जयजयकार अशा भक्तीमय वातावरणात शनिवारी भक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाला निरोप दिला. गणरायाला पुढल्या वर्षी लवकर येण्याचे निमंत्रण देत त्याचे साश्रुपूर्ण नयनांनी विसर्जन केले.





अलिबागसह जिल्ह्यात सर्वत्र दुपारपासूनच गणेश विसर्जनाला सुरूवात झाली. जिल्ह्यात अलिबाग, सासवणे, मांडवा, काशिद, श्रीवर्धन , उरण, मुरूड आदी ठिकाणी समुद्रात गणरायांचे विसर्जन करण्यात आले. तर ज्या ठिकाणी समुद्र नाही तेथे तलाव, नद्या, खाड्यांमध्ये तसेच कृत्रिम तलावामध्ये गणेशमूर्ती विसर्जित करण्यात आल्या.

घरगुती गणपतींचे विसर्जन आटोपल्यानंतर कार्यकर्ते सार्वजनिक गणपतींच्या विसर्जन मिरवणूकीत सहभागी झाले. सार्वजनिक गणपतींच्या विसर्जन मिरवणूकांना सायंकाळी पाच वाजता प्रारंभ झाला. नाशिक बाजा, ढोलताशा या पारंपारिक वाद्यांबरोबच बॅन्जो, डीजे तालावर अबालवृद्ध बेधुंद होवून नाचत होते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मिरवणूकीतील झांजपथक सर्वांचेच आकर्षण ठरले. काही ठिकाणी पारंपारिक कोळी वेषात नृत्य सुरू होते. ते पाहण्यासाठी भक्तांनी एकच गर्दी केली होती. अधून मधून पावसाच्या सरी बरसत होत्या, मात्र गणेशभक्तांचा उत्साह तसूभरही कमी होत नव्हता.

समुद्रकिनारी जीवरक्षक आणि बोटी तैनात ठेवण्यात आल्या होत्या. भक्तांच्या स्वागतासाठी खास स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. तेथून भक्तांना आवश्यक त्या सूचना दिल्या जात होत्या. नगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी या सर्व व्यवस्थेवर जातीने लक्ष ठेवून होते. गणेश भक्तांना कृत्रिम तलावात मुर्त्यांचे विसर्जन करण्याचे आवाहन केले जात होते. गणेश भक्तांना जीव रक्षकांकडून गणेशमुर्ती विसर्जनासाठी मदत केली जात होती. सुरक्षित स्थळी नेऊन खोल समुद्रात गणेशमुर्ती विसर्जित केल्या जात होत्या.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात १६९ सार्वजनिक व १८ हजार ४२ घरगुती गणपतींचे विसर्जन करण्यात आले. (पान २ वर..)

## पुण्यात ३२ तास विसर्जन मिरवणूक

**पुणे : प्रतिनिधी**

दहा दिवसांच्या पाहुणचारानंतर अनंतर चतुर्थीला लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. पुण्यात गणेश विसर्जन मिरवणुकीने सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. तब्बल ३२ तासानंतर पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुक संपली. पुण्यात ७७ वर्षात पहिल्यांदाच असे घडले आहे. पुण्याच्या या विसर्जन मिरवणुकीची फक्त महाराष्ट्रच नाही तर देशभर चर्चा रंगली.

पुणे विसर्जन मिरवणुकीची अखेर सांगता झाली आहे. तब्बल ३२ तास पुण्यात गणेश मिरवणूक सुरू होती. अलका चौकातून २५१ मंडळे गेली. महाराष्ट्र तरूण मंडळ शेवटचा गणपती आहे. शहरातील गणेश विसर्जन मिरवणूक सहा तासावरून ३२ तासांवर गेली. दरवर्षीपेक्षा यावर्षी जास्त वेळ लागला.

पुण्याच्या गणपती विसर्जन मिरवणुकीचा ७७ वर्षांचा इतिहास आहे. यंदा मिरवणूक कमी वेळेत करण्यासाठी पुणे पोलिसांचे प्रयत्न अपयशी ठरल्याचे दिसत आहे. त्यामुळे सरासरी ३० तासांचा विक्रम यांना मोडीत निघाला आहे. पुण्यातील मुठा नदी घाटात पुण्यातील गणपतींचे विसर्जन केले जाते.


राम प्रहर

दिवाळी २०२५

मुक्तछंद

मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.

चला तर लागूया कामाला...

ramprahar@gmail.com

# रामोशी, बेडर समाजाच्या सक्षमीकरणासाठी शासन प्रयत्नशील –मुख्यमंत्री फडणवीस



**पुणे : रामप्रहर वृत्त**

रामोशी–बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळा'च्या माध्यमातून दोन लाख रुपयांपर्यंतचे बिगर तारण कर्ज, तसेच समाजात उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. रामोशी समाजाच्या विकासासाठी यापुढेही सहकार्य करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३४ व्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रसिंह भोसले, आमदार विजय शिवतारे, गोपीचंद पडळकर, राहुल कुल, विक्रम पाचपुते, माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर, माजी आमदार संजय जगताप, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, दौलत शितोळे, अंकुश जाधव, मोहन मदने आदी उपस्थित होते.

इंग्रजांविरुद्ध पहिली ठिणगी पेटवणारे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक हे खऱ्या अर्थाने क्रांतिकारक होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांप्रमाणेच त्यांनी गनिमी काव्याच्या सहाय्याने ब्रिटिशांना धडा शिकवला. समाजाच्या शौर्याची परंपरा आजही जिवंत असून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

रामोशी–बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाला दोन लाख रुपयांपर्यंतचे बिनतारण कर्ज, तर उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. पोलीस भरतीसाठी विशेष योजना, तसेच शिक्षण व प्रशिक्षणाकरिता महाज्योती आणि सारथीमार्फत योजना राबवल्या जातील, असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

## टेम्पो–एसटी बसचा अपघात; टेम्पोचालक जखमी

**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

येथील पोलीस ठाणे हद्दीतील सुकेळी खिंडीच्या उतारावर रविवार (दि.०७) सप्टेंबर रोजी सकाळी ११.४५ वाजण्याच्या सुमारास एक टेम्पो व एस टी बसचा अपघात झाला. या अपघातात टेम्पो चालक गाडीत अडकल्याने जखमी झाला असुन त्याला सुखरूप बाहेर काढून उपचारकरीता रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

रविवार (दि.७) सप्टेंबर रोजी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून पेणकडे जाणारा टेम्पो हा सकाळी ११.४५ वाजण्याच्या दरम्यान सुकेळी खिंडीतील अति वेगात येत असता उतारावर टेम्पो चालकाने ब्रेक दाबला असता गाडी स्लिप झाली. त्याच दरम्यान मागून येणारी श्रीवर्धन बोरीवली एस.. टी.बसची ठोकर लागल्याने हा अपघात झाला. या अपघातात टेम्पो चालकाचा पाय गाडीत अडकला.

अपघाताची माहिती नागोठणे सहा.पो.नि.सचिन कुलकर्णी यांना मिळताच ते आपले सहकारी घेऊन तातडीने घटनास्थळी आले. घटनास्थळी येऊन त्यांनी चालकास गाडीच्या बाहेर सुखरूप काढले. पुढील उपचारासाठी त्याला ॲम्बुलन्स मधून रुग्णालयात पाठविण्यात आले. यावेळी पोलिसांनी अपघातातील वाहने बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली.

या अपघाताची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सहा.पो.नि.सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहेत.

## आमदार महेंद्र थोरवेंच्या गणरायाचे मंत्री भरत गोगावले यांनी घेतले दर्शन



**कर्जत: प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदार संघांचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या निवासस्थानी प्राणप्रतिष्ठा केलेल्या गणरायाचे दर्शन राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी घेतले. यावेळी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महेंद्र थोरवे यांच्या निवासस्थानी श्री गणरायाची प्राणप्रतिष्ठा करण्यात येते. अनंत चतुर्दशी पर्यंत असलेल्या या उत्सवात विविध उपक्रम राबविले जातात. अनंत चतुर्दशीच्या पूर्व संध्येला श्री सत्यनारायणाच्या महापुजेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. यावेळी अनेक भाविक दर्शनासाठी येत असतात.

राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी यंदा थोरवे यांच्या गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी जिल्हाधिकारी किसन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष भाई शिंदे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे, विश्वनाथ थोरवे, सुभाष गवळी, प्रसाद थोरवे, अरुण देशमुख आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेशोत्सवानंतर गावे झाली रिकामी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका हा डोंगराळ दुर्गम भाग असून येथील नागरिक मोठ्या प्रमाणात मुंबई, नालासोपारा, भाईंदर, ठाणे, पुणे शहरांकडे नोकरी व रोजगारासाठी स्थलांतर झाली आहेत. गणेशोत्सव आला की ही चाकरमानी मंडळी गावाकडे मोठ्या प्रमाणात येत असतात.

एस.टी, रेल्वे, खासगी वाहने यांची बुकींग महिनाभर आधी पासून करून नंतर गणेशोत्सवासाठी येण्यास सुरुवात होते. ज्या गावांमधे घरांना कुलपे लागलेली असतात ती कुलपे उघडली जावून गणेशोत्सवात गावे फुल झाल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे.

गणेशोत्सव, होळीउत्सव या दोन सणांना गावे फुल होतात, मात्र आता गणेशोत्सव झाल्यानंतर प्रथम पाच दिवसांचे गणेश विसर्जन झाल्यानंतर जवळपास ७५% चाकरमानीमंळळी परतीच्या प्रवासाला लागली आणि आता अनंतचुर्थीचे गणेश विसर्जन झाल्यानंतर तालुक्यातील चाकरमानी मंडळी पुर्णपणे मुंबई, नालासोपारा व इतर भागात आपल्या नोकरी व्यवसायाकडे परतीचा प्रवास होऊन गेल्याने गावे रिकामी झाली.

गणेशोत्सव या सणाला तळा तालुक्यात विशेष महत्व असून चाकरमानी मंडळी न चुकता गावात आली होती. आठ दिवस गावागावातून प्रकाशमय आनंददायी वातावरण निर्माण होऊन. घराघरातून ढोलकीचा आवाज घुमत होता. गणेशोत्सव हा गावाच्या विकासासाठी चालना देणारा उत्सव ठरत असतो. या काळावधीत चाकरमानी मंडळी, गावकरी मंडळी व गणेश भक्त यांची गावात एकत्र बसून गावच्या विकासा संबंधी व अडीअडचणींन संबंधी चर्चा करून एक प्रकारे गावाच्या विकासाचा आराखडाच तयार केला जातो व त्याप्रमाणे उपक्रम राबविले जातात.तसेच जी गावाच्या विकासाची कामे कोणाच्या माध्यमातून होतील यावरतीही चर्चा करून त्याचेही नियोजन केले जाते. आपला गाव आदर्श व स्वच्छ सुंदर असावे ही संकल्पना गावकऱ्यांमध्ये रूजलेली आहे.

गणेशोत्सवात गावे फुल झाली होती. अशीच गावे फुल राहीली तर असेच आनंदी वावरण राहील. यासाठी तालुक्यात उद्योग व्यवसाय वाढण्याची आवश्यकता आहे. एखादा दुसरा मोठा उद्योग आला तर तालुक्यातील स्थलांतर थांबून व्यवसाय वाढून स्थानिक पातळीवर नागरिकांना रोजगार मिलेल. गणेशोत्सव झाल्यानंतर गावे रिकामी झाली असून गावागावात वयोवृद्ध व कुलुप असलेली बंद घरे पहावयास मिळत आहेत.



## लायन क्लबतर्फे स्वच्छतादूतांना साहित्य वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत गणेश विसर्जन दिनी स्वच्छता दूतांसाठी अनोखा उपक्रम राबवण्यात आला. लायन क्लब ऑफ ऐरोली मार्फत दिघा येथील विसर्जन घाटावर असणाऱ्या स्वच्छता कामगारांना हात मोजे तसेच खाद्य पदार्थाचे वाटप करण्यात आले. सोबत फेरीवाले व गरजू लोकांना देखील खाद्य वाटप करून लाडक्या बाप्पाचा गणेशोत्सव आनंदाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट गवर्नर संजीव सूर्यवंशी, लायन क्लब ऐरोलीचे प्रेसिडेंट संजय आवारे, प्रीती शेट्टी, पालिकेचे माजी निवृत्त अधिकारी गणेश आघाव, राजेश रंगीरे यांनी सहभाग नोंदविला होता त्या प्रसंगी दिघा विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त नैनेश बदले यांनी त्यांच्या कामाचे गौरव केले. इको फ्रेंडली गणेशोत्सवासाठी जनजागृती करण्यात आली.

नवी मुंबई शहर हे स्वच्छ आणि सुंदर शहर आहे. या शहराने देशपातळीवर स्वच्छतेत मानाचे पुरस्कार मिळवले आहेत.

पालिकेच्या बरोबरच येथील नागरिक सामाजिक संस्था यांचे स्वच्छतेत योगदान दिले पाहिजे आणि सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे या अनुषंगाने स्वच्छता धुताना मदत करण्यात आल्याचे लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## लोणेरे विभागात अखंडित वीजपुरवठा नागरिकांनी केले समाधान व्यक्त

**माणगाव : बातमीदार**

गणेशोत्सव हा आनंद, भक्ती व एकतेचा उत्सव. गावागावांत उत्साहाने साजरा होणाऱ्या या उत्सवात विजेचा अखंड पुरवठा हा नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक ठरतो. यंदाच्या गणेश चतुर्थीपासून ते चतुर्दशीपर्यंतच्या उत्सव काळात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या लोणेरे सेक्शनतर्फे नियोजनबद्ध देखभाल करून सुरळीत व अखंड वीजपुरवठा करण्यात आला.

सणाच्या काळात विजेचा लहरी खंड न होता भाविकांना अखंडित सेवा मिळाल्याने सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे. लोणेरे सेक्शनचे अधिकारी व कर्मचारी यांच्या या कार्यक्षमतेचे कौतुक गावागावांत होत असून विज विभागावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

या कार्यामध्ये सहाय्यक अभियंता योगेश बढीया, लाईनमन केशव जांबरे, वायरमन सुरेंद्र शिर्के, हार्षद सालदूर, सोमेश्वर काळस्पेपे, संकेत अंधेरे, भावेश धोंडगे, वृषभ पवार, प्रसाद धाडवे यांनी अपार मेहनत घेतली. दिवसरात्र सेवा देत उत्सव काळात कुठलाही अडथळा येऊ नये यासाठी त्यांनी स्वतःहून पुढाकार घेतला.गावी आलेल्या चाकरमान्यांसह नागरिकांनी विजेच्या सुरळीत सेवेसाठी विज कर्मचारी वर्गाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. सणासुदीच्या काळात विजेची अडचण झाली नाही हेच आमच्यासाठी सर्वात मोठं समाधान, अशी भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली.

## तिरुअनंतपुरम रेल्वेला माणगाव थांबा मिळण्याची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव हे दक्षिण रायगडचे मध्यवर्ती ठिकाण आहे. येथील रेल्वे स्थानकात तिरुअनंतपुरम या रेल्वे गाडीला माणगाव येथील स्थानकात थांबा मिळण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ॲड. राजीव साबळे यांनी रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याचे खासदार सुनील तटकरे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

या मागणीबाबत खासदार सुनील तटकरे यांनी सकारात्मक विचार करून रेल्वे मंत्री अश्विनी वैशणव यांच्या कडे आग्रह केला जाईल. या रेल्वेला माणगाव येथे थांबा मिळावा यासाठी गुजरात, राजस्थान, दिल्ली, मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेश तसेच दक्षिण रायगड येथील रहिवाशांनी मागणी केली आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक सोयीस्कर होईल असे प्रवाशी संघटनेचे सामाजिक कार्यकर्ते शाहनू शहा यांनी ॲड. राजीव साबळे यांच्याकडे मागणी केली होती. त्या दृष्टीने खासदार सुनील तटकरे हे तिरुअनंतपुरम ते योगनगरी ऋषिकेश २२६५९ या रेल्वे गाडीला माणगाव येथे थांबा मिळण्यासाठी आवश्यक प्रयत्न करत आहेत, असे ॲड. राजीव साबळे यांनी सांगितले.

रत्नागिरी ते माणगाव हे ४०० किमी तर माणगाव ते पनवेल हे २०० किमी अंतरावर आहे. हि रेल्वे रत्नागिरी, पनवेल, पालघर, वसई, सुरत बडोदा अशा स्थानकात थांबून हरीद्वार, ऋषिकेश या तिर्थक्षेत्राच्या स्थानकात थांबत असल्याने भक्तांनाही लाभ होईल, असे शाहनू शहा यांनी सांगितले.

पान १ वरुन

## रायगडात ढोलताशांच्या गजरात गणपती बाप्पाला निरोप

विसर्जन व मिरवणूकांदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. वाहतूक कोंडी होवू नये यासाठी अलिबागेत विसर्जनस्थळांकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांवरील वाहतूक बंद करण्यात आली होती. गणेश मिरवणूका व पायी जाणारे गणेशभक्त यांना प्रवेश दिला जात होता. आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी गणेशभक्तांनी समुद्रकिनारी गर्दी केली होती. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या विसर्जन मिरवणूका रविवारी पहाटेपर्यंत सुरू होत्या.

गणेश विसर्जनादरम्यान अलिबाग नगर परिषद आणि नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने श्री सदस्यांनी निर्माल्य संकलनाची मोहीम राबवली. समुद्रात निर्माल्य टाकले जाऊ नये यासाठी ठिकठिकाणी श्री सदस्य उभे होते. यावेळी संकलित करण्यात आलेल्या निर्माल्यापासून सेंद्रीय खताची निर्मिती केली जाणार असून हे खत प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेल्या वृक्षलागवडीच्या संवर्धनासाठी केले जाणार आहे.





## मराठी भाषा वाचन स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला या गोष्टीला ३ ऑक्टोबर २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने मुंबईतील 'आरती आर्ट अकादमी' जी गेली २३ वर्ष सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे त्या संस्थेतर्फे जागर अभिजात मराठीचा या कार्यक्रमा अंतर्गत मराठी भाषा वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.

ही स्पर्धा १४ वर्षांवरील वयोगटातील सर्वांसाठी खुली स्पर्धा आहे. स्पर्धेची प्राथमिक फेरी शुक्रवार २६ सप्टेंबर रोजी बोरवली येथे होणार आहे, तर अंतिम फेरी ३ ऑक्टोबर २०२५ रोजी बोरिवलीतील प्रबोधनकार ठाकरे (जयवंत दळवी लघु) नाट्यगृहात होणार आहे. स्पर्धेसाठी रुपये ५०००/–,३०००/–,१००० आणि उत्तेजनार्थ रुपये ५०० ची दोन रोख बक्षिसे आणि प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे .

जयवंत दळवी, शं ना नवरे, व पु काळे, पु ल देशपांडे, शंकर पाटील, द मा मिरासदार यापैकी कुठल्याही लेखकाची कथा अथवा लेख यांचे ५ ते ७ मिनिटाच्या कालावधीत वाचन करायचे आहे. स्पर्धेसाठी प्रवेश फी रुपये १००/– आहे. स्पर्धेची विस्तृत माहिती जाणून घेण्यासाठी पुढील भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष /विश्वस्त प्रदीप कबरे यांनी केले आहे. संपर्क :९९२०३९९८७९, ९८२०६ ६३७१२

## गणेशभक्तांना पाच हजार वडापावचे वाटप

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबईतील प्रसिद्ध आणि सुपरिचित करावे गावातील 'मास्टर शेफ भोजनालय आणि उपहारगृह' हे त्यांच्या स्वादिष्ट पदार्थांसाठी ओळखले जाते. त्यात आता भर पडली आहे ती, या दुकानाचे मालक जितेश म्हात्रे यांच्या उपक्रमाची, जितेश म्हात्रे यांनी अनंत चतुर्दशीच्या दिनी, करावे गावातील तलावावर विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांना ५ हजार वडापावचे मोफत वाटप केले.त्यामुळे धो धो पाऊस कोसळत असताना, विसर्जनासाठी आलेल्या भिजलेल्या, थकलेल्या भाविकांच्या पोटाला त्यामुळे तात्पुरता आधार मिळाला. म्हात्रे यांच्या उपक्रमाचे कौतुक



होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून जितेश म्हात्रे अनंत चतुर्दशीच्या दिवशी श्री गणेश विसर्जन घाटावर बाप्पाला निरोप देण्यासाठी येणाऱ्या गणेश भक्तांना मोफत अल्पोपहाराची (वडापाव) सेवा देतात. हे काम ते कोणत्याही प्रसिद्धीशिवाय, निःशुल्क आणि नियोजनबद्ध पद्धतीने करतात.त्यांच्या या दातृत्वातून समाजात सकारात्मक संदेश पसरत असून, दरवर्षी न चुकता म्हात्रे हा उपक्रम अनंत चतुर्दशीला राबवत असतात. त्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे करावे ग्रामस्थांनी देखील कौतुक केले.

# पनवेलमध्ये गणरायाला भावपूर्ण निरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात शनिवारी अनंत चतुर्दशी दिवशी सुमारे सहा हजार ६३९ पेक्षा अधिक घरगुती व सार्वजनिक गणपतींचे भाक्तिमय वातावरणात नियोजनबध्द, शांततेत विसर्जन करण्यात आले.

माझी वसुंधरा ६.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महापालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचं पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' ही मोहिम हाती घेतली होती. गणेशभक्तांच्या सोयी – सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग, पर्यावरण विभाग या ८ विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी लायन्स क्लब पनवेलसारख्या विविध एनजीओ, सामाजिक संघटनादेखील महापालिकेस सहकार्य करत होत्या.

### महापालिका क्षेत्रात शांततेत विसर्जन



यावर्षी महापालिकेच्यावतीने एकुण १३४ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली होती. यामध्ये ५८ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली होती. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर, निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली होती. याचबरोबर आवश्यक ठिकाणी सार्वजनिक गणेश मंडळांच्या मोठ्या गणपतींचे विसर्जन करण्यासाठी मोठ्या क्रेन व हायड्राची सोय करण्यात आली होती.

दरम्यान, विसर्जन कार्यक्रम सुरळित पार पडावा यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह सर्व उपायुक्त व सहाय्यक आयुक्त, प्रभाग अधिकारी, अग्निशमन विभाग कर्मचाऱ्यांनी पालिकेच्या सर्व विसर्जन ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थेचे निरीक्षण करून व्यवस्थापन करत होते. अगदी शेवटच्या गणपती विसर्जनापर्यंत महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी गणेश विसर्जन सुरळीत व्हावे यासाठी झटत होते.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जन घाटांवर गणपतींचे सुव्यवस्थित विसर्जन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने अग्निशमन दल, वाहतूक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी, मुख्यालय कर्मचारी तसेच पोलिस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त करण्यात आला होता. तसेच वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक विसर्जन स्थळांवरती प्राथमिक उपचारार्थ सेवा देण्यात आली होती. पालिका क्षेत्रातील गणेश मंडळाच्या दारात जाऊन दररोज निर्माल्य गोळा करण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्यावतीने विशेष 'निर्माल्य संकलन रथ' तयार केले होते. या निर्माल्य संकलन रथाच्या माध्यमातून दररोज निर्माल्य संकलन केले जात होते.

### निर्माल्याचे संकलन

*श्री शिव समर्थ तलाव, खारघर गाव येथे प्रभाग समिती अ खारघरमधील श्रीगणेश विसर्जनवेळी घरगुती गणेशोत्सवातील निर्माल्य आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये दररोज निर्माण होणाऱ्या निर्माल्याचे संकलन विशेष निर्मूलन संकलन रथाद्वारे करून हे निर्माल्य संकलन रथाद्वारे नियोजित ठिकाणी पोहचवून त्यावर पर्यावरण पूरक प्रक्रिया राबवून खत निर्मिती करण्यात येत आहे. या प्रक्रियेद्वारे तयार केलेले खत बगीचे आणि झाडांसाठी वापरण्यात येणार आहे.*

### खास ट्रॉलीची सोय

*कळंबोलीतील म्हसोबा तलाव येथे मोठ्या गणेशमुर्तींचे विसर्जन करण्यासाठी खास ट्रॉलीची सोय करण्यात आली होती. कृत्रिम तलावात गणेशमूर्ती विसर्जन केलेल्या नागरिकांना महापालिकेच्या वतीने प्रमाणपत्र देण्यात आले.*

# उरणमध्ये दहा दिवसांच्या गणेशमुर्तींचे विसर्जन

**उरण : वार्ताहर**

ढोलताशांच्या गजरात गणपतीबाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, गणपती गेले गावाला,चैन पडेना आम्हाला' असा घोष करत शनिवारी हजारो भाविकांनी पावसाच्या सोबतीने दहा दिवसांचे गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.



संध्याकाळ पासूनच ठीक– ठिकाणाहून ढोलताशांच्या गजरात विसर्जनाच्या मिरवणुका निघाल्या होत्या. गणपतीच्या विसर्जन सोहळ्यामुळे अवघी उरण तालुक्यातील ग्रामीण भागसह उरण शहर भक्तिमय झाले होते.

एक दोन तीन चार, गणपती बापांचा जयजयकार असा गणरायाचा जागर करत टाळ, मृदुंग आणि ढोल ताशा नाशिक ढोल च्या तालावर थिरकत मिरवणुका विसर्जनास्थळाच्या दिशेने पुढे सरकत होत्या. कुणी डोक्यावर, हातगाड्यांवर, तीन चाकी टेम्पो अश्या वाहनांमधून विसर्जनस्थळी गणपतींना आणले जात होते.

गणपती बाप्पाचे आगमन बुधवार (दि.२७ )गणेश चतुर्थी दिवशी झाले. दहा दिवसांच्या मुक्कामानंतर शनिवारी (दि.६) रोजी भावपूर्ण, भक्ती भावाने गणपती बाप्पाला उरण शहर सह ग्रामीण भागात निरोप देण्यांत आला ग्रामीण भागात नदी, तलाव येथे विसर्जन करण्यात आले.

उरण नगर परिषद वतीने उरण नगर परिषद मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उरण नगर परिषदेचे विमला तलाव, भोवरा तलाव व मोरा जेट्टी येथे चांगली व्यवस्था करण्यात आली. प्रत्येक ठिकाणी कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. जेणे करून नागरिकांना गणपती बाप्पाचे विसर्जन करतांना कोणतीही गैरसोय होणार नाही त्याकडे लक्ष दिले जात होते.

उरण नगर परिषदेच्या वतीने या वर्षापासून प्लास्टर ऑफ पॅरीसच्या गणपती मूर्ती विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावाची उभारणी केली होती त्यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरीस च्या गणपती मूर्ती विसर्जन करण्यात आल्या.

शाडूच्या माती पासून बनविल्या गणेश मूर्ती विमला तलावात विसर्जन करण्यात आल्या. या कामी उरण शहरातील देवूळवाडी तील गणपती विसर्जन मित्र मंडळ यांनी आलेल्या गणेश मूर्तींचे विसर्जनाचे काम व्यवस्थित केले.

या वेळी उरण नगरपरिषद मुख्याधिकारी समीर जाधव, प्रशासकीय अधिकारी राजेंद्र घाडगे, विशाल गायकवाड, संजय परदेशी, हर्षद कांबळे, संदेश शिरकुरकर, आकाश कवडे, सुनील जाधव, धनेश कासारे, हितेंद्र जाधव, नितीन मोहिते, दीक्षय गायकवाड व गणपती विसर्जन मित्र मंडळ देऊळवाडी–उरण सर्व सदस्य, नागरी सव्रक्षण दल (सिव्हील डिफेन्स) रायगड टीम, अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डीझास्टर मॅनेजमेंटचे ३५ सयंसेवक होते व सर्व सयंसेवक आदी उपस्थित होते.

# मीयावाकी पद्धतीने वृक्षलागवड प्रकल्पासंदर्भात स्थळ पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रकमेच्या शासन मान्यता प्राप्त सविस्तर प्रकल्प अहवालानुसार 'मियावकी' प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. या मीयावाकी पद्धतीने वृक्षलागवडीच्या पूर्वतयारीसाठी शनिवारी (दि.६) ओवे गाव खारघर हिल येथे स्थळ पाहणी करण्यात आली.



अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही संयुक्त स्थळ पाहणी पार पडली. या संयुक्त स्थळ पाहणीसाठी पर्यावरण विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे, वन परिमंडल अधिकारी अशोक घुगे, वन परिक्षेत्र अधिकारी गजानन पानपट्टे, पाणीपुरवठा विभाग प्रमुख विलास चव्हाण व पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण यांच्यासह पालिकेच्या पर्यावरण विभागाचे आणि शासनाच्या वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्थळ पाहणी दरम्यान प्रस्तावित क्षेत्राचे भौगोलिक व पर्यावरणीय बाबी, पाणीपुरवठा सुविधा, वृक्षलागवडीस आवश्यक पूर्वतयारी व इतर पूरक बाबींचा आढावा घेण्यात आला. तसेच आगामी वृक्षलागवड उपक्रमासाठी विभागनिहाय जबाबदाऱ्या व संबंधित विभागाने करावयाची कार्यवाही यांवर प्राथमिक चर्चा करण्यात आली.

# चिरनेर–खारपाडा मार्गावरील पात्रादेवी रस्त्यावर टाकले डेब्रिज

**उरण : प्रतिनिधी**

पर्यावरणाला हानीकारक ठरणारे मुंबईतील डेब्रिज बेकायदेशीररीत्या चिरनेर–खारपाडा मार्गावरील पात्रादेवी रस्त्यावर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत जागोजागी टाकावू डेब्रिज टाकण्यात आले आहे. अवैधरित्या डेब्रिज टाकणाऱ्यांवर कडक कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केली जात आहे. मुंबईतील मोठ्या प्रमाणावर डेब्रिज नवी मुंबई, पनवेल उरण परिसरातील जागा मिळेल त्या ठिकाणी टाकला जात असल्याने येथील नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.



या डेब्रिजमध्ये पर्यावरण व नागरिक, जैवविविधतेला घातक ठरणाऱ्या धोकादायक घटकांचाही मोठ्या प्रमाणावर समावेश असतो. दरम्यान विविध शासकीय विभागांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नजरा चुकवून रात्रीच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर मुंबईतील डेब्रिज या भागात आणण्यात येते आहे. मुंबईतुन मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या या बेकायदेशीर डेब्रिजमुळे मात्र नवी मुंबई, पनवेल, उरण मधील काही ठिकाणी डेब्रिजचे डोंगरच निर्माण झाले आहेत.

यामुळे मात्र पर्यावरण व नागरिक, जैवविविधतेचीही मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे. या गंभीर प्रकारामुळे पर्यावरण विभाग, नागरिकांमधून चिंता व्यक्त केली जात असतानाच चिरनेर खारपाडा मार्गावर गणेशोत्सवाच्या काळात रात्रीच्या वेळेत घातक डेब्रिज टाकण्यात आले आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवासी व नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

# पीरवाडी समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अनंत चतुर्दशी व श्री गणेश विसर्जन झाल्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर साचलेले निर्माल्य, केरकचरा, कॅरीबॅग, पाणी बॉटल्स तसेच गणपती विसर्जनासोबत टाकण्यात येणाऱ्या इतर वस्तू एकत्रित जमा करून सबंध समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जेसर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या स्वच्छता अभियानात विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षण व स्वच्छता संवर्धन याविषयी उपक्रम राबवून समाजात स्वच्छतेचा संदेश पोहोचवला. या वेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे, प्रा.सौ.विनेता तांडेल तसेच इतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.



# पनवेल येथे ७० शिक्षकांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाज घडविणारे ७० शिक्षक, प्रशिक्षक यांना मानवंदना सन्मानपत्र देऊन वैश्य समाजाच्या पनवेल, मिरची गल्ली येथील सभागृहामध्ये वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सन्मानित करण्यात आले.



वैश्य समाजामध्ये अशा प्रकारचा उपक्रम करणारी जगामधील ही पहिली संस्था आहे. वाशी ते पनवेल विभागाने हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे विश्वस्त मनोज महादेव आंग्रे, रायगड विभाग कॉर्डिनेटर संतोष दलाल, संगीता लाड, नितीन पानसरे, प्रशांत संसारे, अदिती तांबोळी, लिना मुंज, प्रमोद चोचे, प्रज्ञेश मांडवकर, वैष्णवी तांबोळी, गीता गांधी, रोशन आदी सभासदांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त /अध्यक्ष डॉ. संतोष कामेरकर, विश्वस्त /सचिव रूपाली तेलवणे, ब्युरोक्रेटस विभागाचे प्रमुख अ‍ॅड. संतोष भालेकर पनवेल समाजाचे अध्यक्ष सुनील शेटये, वर्षा साखरे, वैश्य समाज रायगड जिल्हा महिला अध्यक्ष शामल आंग्रे आदी उपस्थित होते.



**पनवेल : भाजपचे नवीन पनवेल शहर मंडळ सरचिटणीस भिमराव पोवार यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी मागासवर्गीय सेलचे खांदा कॉलनी अध्यक्ष चंद्रकांत सोणावणे, प्रभाग अध्यक्ष शांताराम महाडीक, ब्रम्हा सावंत, विजय खोत, आमोल पाटील, प्रदीप चिंचकर, दिपक जांबळे, मारुती खांबस आदी उपस्थित होते.**

# गणपती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने आयोजीत केलेल्या गणपती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ शनिवारी (दि.६) झाला. या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षीश देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा पनवेलतर्फे दरवर्षी गणेशोत्वाच्या काळात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. त्यानुसार यांदाही गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेकांनी आकर्षक अशी सजावट केली होती. या स्पर्धे चा बक्षीस वितरण समारंभ पनवेल शहरातील भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात पार पडला.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक अभिमन्यू भंडारी, हिमांशू पाटील, कुणाल पायले यांनी पटकावला, द्वितीय क्रमांक मुकेश गिल्डा, हितेश भोपी, मयुर भोईर यांनी तर तृतीय क्रमांक अनिमेष ओझे, अन्नन्य चितळे, विजय गायकर यांनी पटकावला. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानीत करण्यात आले.

या वेळी अरुणशेठ भगत यांनी विजेत्यांचे अभिनंदन करुन पुढच्यावर्षी आणखी उत्साहाने या स्पर्धेत सहाभागी व्हावे असे सांगीतले. यावेळी भाजपचे पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, प्रभाग क्रमांक १९ चे अध्यक्ष पवन सोनी, देवांशू प्रभाळे उपस्थित होते.



**खारघर : उत्तराखंड सरकारचे कॅबिनेट मंत्री (शिक्षण, आरोग्य आणि सहकार मंत्री) डॉ. धनसिंग रावत यांचे खारघर येथे उत्तर रायगड भाजपच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी भाजपचे जिल्हा माजी सचिव ब्रिजेश पटेल यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**

## संपादकीय

# शेतकऱ्यांना दिलासा

पावसाचा अनियमितपणा वाढत आहे. यंदा सुरुवातीला ओढ देणाऱ्या पावसाने नंतर मात्र कसर भरून काढत जोरदार वृष्टी केली. त्यामुळे पाणीसाठ्यात वाढ झाली असली तरी कमी काळात अधिक पावसामुळे शेतपिकांचे नुकसान झाले. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून मदत दिली जाणार आहे.

**या वर्षी पावसाचे संतुलन बिघडले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हीच तऱ्हा पहायला मिळत आहे. संपूर्ण ऋतूचक्रच बदलले आहे. पावसाळाही त्याला अपवाद नाही. पूर्वी जून ते सप्टेंबर असे चार महिने मान्सूनचे असत. आता वर्षभर कधीही, कुठेही पाऊस पडतो. यंदादेखील अवकाळी पाऊस पडला. मे महिन्यात त्याचे प्रमाण वाढले आणि जून महिन्यात मात्र तो संमिश्र राहिला. जूननंतर हमखास पाऊस पडणाऱ्या जुलैमध्येही म्हणावा तशी पावसाने सुरुवात केली नाही. एरवी जुलैमध्ये पूर, महापूर येत असतात. त्यात नैसर्गिक आपत्तीही ओढावतात, पण यंदा जुलैमध्ये पावसाची सरासरी तुलनेने कमीच राहिली. जुलैच्या पूर्वार्धात विश्रांती घेणाऱ्या पावसाने उत्तरार्धात हजेरी लावली. यानंतर ऑगस्टमध्ये जिथे पावसाचे प्रमाण कमी होत असते तिथे मात्र जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. सर्वसाधारपणे राज्यात कोकण, पश्चिम महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडत असतो, पण यंदा मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात वरुणराजाने धुमाकूळ घातला. मराठवाड्यात तर अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश पाऊस पडून पूरस्थिती निर्माण झाली. यामध्ये काही जणांना आपला जीव गमवावा लागला. जनावरांचाही बळी गेला. राज्यात अतिवृष्टीमुळे २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात १४ लाख ४४ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र (३६,११,८७२.५ एकर) बाधित झाले आहे. त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे आहेत. यामध्ये १५ ते २० ऑगस्टदरम्यान पडलेल्या सर्वाधिक पावसामुळे शेतीपिकांचे जास्त नुकसान झाले आहे. सर्वाधिक बाधित जिल्हे नांदेड (६,२०,५६६ हेक्टर), वाशीम (१,६४,५५७ हेक्टर), यवतमाळ (१,६४,९३२ हेक्टर), धाराशिव (१५०,७५३ हेक्टर), बुलढाणा (८९,७८२ हेक्टर), अकोला (४३,८२८ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर), हिंगोली (४०,००० हेक्टर) आहेत. यामध्ये सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे. परभणी, अमरावती, जळगाव, वर्धा, सांगली, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धुळे, जळगाव, रत्नागिरी, चंद्रपूर, सातारा, नाशिक, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गडचिरोली, रायगड व नागपूरमध्येही नुकसान झाले. सुदैवाने राज्यात शेतकऱ्यांचा संवेदनशीपणे विचार करणारे महायुतीचे सरकार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या निर्देशानुसार बाधित भागात सुरू केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्प्यात असून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतकरी बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटले. त्यामुळे राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**

# ग्रामीण शेत रस्त्यांना मिळणार कायदेशीर ओळख



महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातील रस्ते, पायवाटा व शेतावर जाणारे मार्ग शेतकऱ्यांसाठी व गावांच्या विकासासाठी अत्यावश्यक आहेत. याबाबत शासनाच्या महसूल व वन विभागाने २९ ऑगस्ट २०२५ रोजी एक महत्त्वाचा शासननिर्णय जारी केला आहे. या निर्णयामुळे जुने नकाशे, त्यातल्या नोंदी, नवीन रस्त्यांशी संबंधित प्रश्न व अतिक्रमण यावर सकारात्मक तोडगा निघणार आहे.

अनेक वर्षांपासून शेत रस्त्यांच्या नोंदी बरोबर नसणे, नकाशात रस्ताच नसणे, असला तरी त्यावर अतिक्रमण असणे, या सगळ्यामुळे स्थानिक पातळीवर वाद निर्माण होत होते. शेतीत वाढलेला यांत्रिकीकरणामुळे चांगल्या रस्त्यांची गरज अधिकच वाढली आहे. ही बाब लक्षात घेऊनच शासनाने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे वैशिष्ट्य म्हणजे तक्रारी आल्यावरच कारवाई करण्याऐवजी, तंत्रज्ञान व लोकांचा सहभाग घेऊन एक कायमस्वरूपी, सक्षम व पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे, जेणेकरून भविष्यातील वाद टाळता येतील.

या शासन निर्णयात वेगवेगळ्या रस्त्यांचा स्पष्ट उल्लेख आहे. गावागावांना जोडणारे साधे ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते, हे नकाशात ठळक अशा रेषेने दाखविलेले जातात. जे शासनाच्या मालकीचे असतात. याशिवाय ग्रामीण गाडी मार्ग, पाय मार्ग यांचा पण उल्लेख करता येईल. हे रस्ते अनेकदा सर्वे नंबर मध्ये पोट खराब म्हणून नोंदवलेले असतात. पोट खराब म्हणजे म्हणजे जमिनीचा असा भाग जो लागवडीखाली नाही ; पण तो शासकीय मालकीचा आहे. नकाशात ते तुटक रेषेने दाखविलेले असतात. म्हणजे डबल किंवा सिंगल डॉटेड लाईनने मध्ये नकाशात दाखविलेले असतात.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे हे शेतावर जाण्याचे वहिवाटीचे रस्ते आहेत. ज्यांची मूळ नकाशात अनेकदा नोंदच सापडत नाही. या शासननिर्णयात आधी रस्त्यांचे प्रकार स्पष्ट केले आहेत, मग त्यांची आताची स्थिती म्हणजे ते अस्तित्वात आहेत का, अतिक्रमण आहे का, हे तपासण्यासाठी त्यासाठी प्रत्येक गावात एक प्रक्रिया ठरवली आहे. ग्रामसेवक किंवा तलाठी त्यांच्या मदतीला कोतवाल, पोलीस पाटील व स्थानिक जाणकार लोक या सगळ्यांनी मिळून प्रत्यक्ष शिवारात फिरायचे ज्याला 'शिवार फेरी' म्हटले गेले आहे. शिवार फेरीत प्रत्यक्ष पाहणी करायची. यातून प्रपत्र – १ आणि प्रपत्र – २ अशा दोन प्रकारच्या याद्या तयार करण्यात येतील. यातील प्रपत्र – १ मध्ये नकाशावर असलेले रस्ते मग ते वापरात असो किंवा अतिक्रमित त्यांची नोंद असेल आणि प्रपत्र – २ मध्ये नकाशावर नाहीत पण वापरात आहेत किंवा अतिक्रमित आहेत. अशा रस्त्यांची नोंद असेल. या याद्यांना मग ग्रामसभेची मान्यता घ्यावी लागेल. त्यानंतरच त्या तहसीलदारांकडे जातील म्हणजे येथे लोकांचा सहभाग महत्त्वाचा मानला गेला आहे.

रस्त्यांची ओळख पटवण्याचा हा मुद्दा शासननिर्णयात स्पष्ट करण्यात आला आहे. जे रस्ते नकाशावर नाहीत किंवा ज्यांच्यावर अतिक्रमण आहे. अशा रस्त्यांचे काय करायचे ही प्रशासनापुढे मुख्य समस्या असते. यावर शासननिर्णयात तोडगा काढण्यात आला आहे. ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर जे रस्ते नकाशावर नाहीत किंवा अतिक्रमित आहेत, त्यांचे सीमांकन करण्याची जबाबदारी भूमी अभिलेख विभागावर टाकली आहे. यासाठी भूमी अभिलेख विभाग आधुनिक तंत्रज्ञान वापरणार आहे. म्हणजे डिजिटल नकाशे, जिओ रेफरन्सिंग वगैरे प्रत्यक्ष जागेवर मोजणी करून सीमा चिन्ह (बाउंड्री पिलर्स) उभारले जातील. यातील एक चांगली गोष्ट म्हणजे या मोजणी आणि सीमांकनासाठी शेतकऱ्यांकडून कोणतेही शुल्क घेतले जाणार नाही. यामुळे शेतकऱ्यांवर यासाठी कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

या निर्णयात सीमांकनामध्ये अतिक्रमण काढण्यासाठी एक स्पष्ट कायदेशीर मार्ग दिला आहे. तहसीलदार काय करतील ग्रामसभेकडून आलेली यादी, सीमांकन अहवाल व प्रत्यक्ष पाहणी या सगळ्याचा विचार करून मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम पाच अन्वये संबंधितांना कायदेशीर नोटीस देतील. यात नैसर्गिक न्यायाचे तत्व पाळले जाईल. ज्यांच्यावर अतिक्रमणाचा आरोप आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण संधी मिळेल. सुनावणी होईल, साक्षीदारांचे जबाब घेतले जातील. त्यानंतरच तहसीलदार अतिक्रमण काढण्याचे आदेश देतील. गरज वाटली तर पोलीस बंदोबस्ताची पण तरतूद असून त्यासाठीही वेगळे शुल्क नाही. एकदा का अतिक्रमण काढले की, तो रस्ता नकाशात नोंदवला जाईल. ही कायदेशीर प्रक्रिया स्पष्ट केल्यामुळे अंमलबजावणी सोपी होणार आहे. अतिक्रमण काढण्यासाठी आता एक ठरलेली व कायदेशीर पद्धत असणार आहे.

नकाशावरचे, पोट खराब, वहिवाटीचे व नवीन निश्चित झालेले या वेगवेगळे रस्त्यांच्या एकत्रित नोंदी ठेवण्यासाठी एक नवीन 'गाव नमुना नंबर एक – फ' तयार केला जाणार आहे. ही एक स्वतंत्र रस्त्यांची नोंदवही असणार आहे. यात प्रत्येक रस्त्याचा सगळा तपशील असणार आहे. त्याचा प्रकार काय आहे ? कुठल्या सर्वे नंबर मधून जातोय ? रुंदी किती ? दिशा कोणती ? त्यावर काही अतिक्रमण आहे का ? याची माहिती, सगळे काही एकाच ठिकाणी नोंदविले जाईल. यामुळे माहिती शोधणे सोपे होईल व भविष्यातले वाद कमी व्हायला मदत होईल अशी अपेक्षा आहे. यामुळे शेत रस्त्यांची सगळी माहिती एकाच ठिकाणी मिळणार आहे. विशेष म्हणजे याला आधार म्हणून प्रत्येक रस्त्याला एक विशिष्ट ओळख क्रमांक म्हणजे युनिकोड दिला जाणार आहे. युनिकोडची एक रचना ठरवलेली आहे. उदाहरणार्थ – जिल्हा कोड, तालुका कोड, गाव कोड, अनुक्रमांक व रस्त्याचा प्रकार दाखवणारा कोड (ए, बी, सी) अशा पद्धतीने हा क्रमांक असेल. हा कोड 'वाजिब – उल – अर्ज' म्हणजे जी गावाच्या हक्कांबाबतची जुनी नोंदवही असते त्यात आणि अर्थातच या नवीन' गाव नमुना एक – फ' मध्ये नोंदवला जाईल. यामुळे प्रत्येक रस्त्याची एक डिजिटल ओळख तयार होईल.

या कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर व उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. महसूल, भूमी अभिलेख, पोलिस, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अधिकारी यात सहभागी असतील. या समित्या जनजागृती, आढावा, अंमलबजावणीतल्या अडचणी दूर करणे व विभागांमध्ये समन्वय साधणे याची जबाबदारी सांभाळतील.

या शासननिर्णयामुळे ग्रामीण शेत रस्त्यांना कायदेशीर ओळख मिळणार असून रस्त्यांच्या नोंदी अद्ययावत, पारदर्शक व एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. अतिक्रमण काढण्यासाठी निश्चित कायदेशीर प्रक्रिया ठरल्याने शेतकरी व ग्रामस्थ यांचे अनेक वर्षांपासूनचे वाद मिटण्यास मदत होईल.

**शब्दांकन – सुरेश पाटील,**
प्र.जिल्हा माहिती अधिकारी, अहिल्यानगर.

## बदलते तंत्रज्ञान

# बीएसएनएलने लॉन्च केला सर्वात स्वस्त प्लॅन

बीएसएनएल सातत्याने आपल्या नेटवर्कमध्ये सुधारणा करत नवीन युजर्स जोडण्याचा प्रयत्न करत आहे. शिवाय, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध प्लॅन्सही आणत आहे. आता इछ्छ ने ७२ दिवसांच्या वैधतेसह एक स्वस्त प्लॅन लॉन्च केला आहे. या प्लॅनमध्ये युजरला दररोज २ जीबी डेटा, अमर्यादित कॉलिंगसह अनेक फायदे मिळतील.

ट्रायच्या एका अहवालानुसार बीएसएनलच्या ग्राहकांची संख्या कमी झाली आहे. ऑगस्टमध्ये कंपनीने नवीन युजर्स जोडण्यासाठी १ रुपयांचा प्लॅन देखील लॉन्च केला, ज्यामध्ये ३० दिवसांची वैधता, दररोज २ जीबी डेटा, अमर्यादित कॉलिंग आणि मोफत एसएमएसचे फायदे होते. बीएसएनएलची ही फ्रीडम ऑफर नवीन ग्राहकांसाठी होती. बीएसएनएलची ही १ रुपयांची ऑफर ३१ ऑगस्ट रोजी संपणार होती, जी कंपनीने आता १५ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे.

**७२ दिवसांचा प्लॅन**

बीएसएनएलने त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवरून हा स्वस्त प्लॅन जाहीर केला आहे. या रिचार्ज प्लॅनमध्ये ७२ दिवसांची वैधता मिळते. ४८५ रुपयांच्या या स्वस्त प्लॅनमध्ये अमर्यादित कॉलिंग आणि मोफत राष्ट्रीय रोमिंगचा फायदा मिळतो. तसेच, बीएसएनएलचा हा रिचार्ज प्लॅन दररोज २ जीबी हाय स्पीड डेटा आणि १०० मोफत एसएमएससह येतो.

याशिवाय बीएसएनएल आपल्या सर्व मोबाइल ग्राहकांना बीआयटीव्हीची सुविधा देत आहे. यामध्ये ३५० हून अधिक लाईव्ह टीव्ही चॅनेल आणि ओटीटी ॲप्सची सुविधा मिळेल. एवढेच नाही, तर कंपनीने अलीकडेच बीआयटीव्हीचा प्रीमियम प्लॅनदेखील सादर केला आहे. १५१ रुपयांच्या प्लॅनमध्ये ४५०हून अधिक लाईव्ह टीव्ही चॅनेल, २३हून अधिक ओटीटी ॲप्स इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत.

खासगी मोबाईल्स कंपन्यांनी आपल्या दरांमध्ये भरमसाठ वाढ केल्यानंतर अनेक लोक पुन्हा बीएसएनएलकडे वळले आहेत. त्यामुळे बीएसएनएलही नवनवे प्लॅन्स देऊन ग्राहकांना आपल्याकडे आकर्षित करीत आहे. एकीकडे बीएसएनएलच्या टॉवरमध्ये वाढ होत असताना दुसरीकडे फियाशतशीर प्लॅनही येत आहेत.

# सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले



## निमित्त

आशा भोसले या जागतिक कीर्तीच्या गायिका असून जगात सर्वांत जास्त गाणी (१२,०००) गायल्याची विक्रमी नोंद त्यांच्या नावावर जमा आहे. आशा भोसले यांचा जन्म सांगली येथे झाला. मा.दीनानाथ मंगेशकर व माई मंगेशकर यांचे हे तिसरे अपत्य. लता मंगेशकर व मीना मंगेशकर (खडीकर) या त्यांच्या थोरल्या बहिणी, तर उषा मंगेशकर व हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची धाकटी भावंडे. आशा भोसले यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयीचा लेख...

आशा भोसले यांच्यावर लहानपणासूनच संगीताचे संस्कार होते, तरी त्यांना गायनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळाले नव्हते. शास्त्रीय संगीताच्या शिक्षणासाठी त्या शंकरराव व्यासांच्या विद्यालयात शिकू लागल्या. व्यास संगीत विद्यालयात त्यांनी शास्त्रीय संगीताच्या परीक्षा दिल्या. एका परीक्षेच्या वेळी शंकररावांनी आशा भोसले यांना बडे गुलाम अली खाँ यांची 'आए न बालम' ही ठुमरी म्हणण्यास सांगितली. आशा भोसले यांनी अतिशय तन्मयतेने ही ठुमरी गायली आणि त्या परीक्षेत पहिल्या आल्या. नंतर काही काळ त्या मास्टर नवरंग नागपूरकर यांच्याकडेही रागसंगीत शिकल्या.


आशा भोसले १९४८ सालापासून मराठी व हिंदी चित्रपटांत पार्श्वगायन करू लागल्या. आज 'आशा भोसले' या नावाला जे वलय आहे, त्यामागे त्यांची प्रचंड मेहनत, जिद्द आणि संघर्ष आहे. पार्श्वगायनाची कामे आशा भोसले यांना मिळू लागली तरी त्यांचा मार्ग सुकर नव्हता. त्या काळात मराठी–हिंदी क्षेत्रात अनेक नामवंत गायिका होत्या, तसेच त्यांची मोठी बहीण लता मंगेशकर यांनी स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यामुळे आशा भोसले यांना स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करायची होती. त्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत केली आणि त्यामुळेच आज त्यांची ओळख एक चतुरस्त्र गायिका अशी आहे.

गाण्यातील कोणताही प्रकार आपल्याला सहज गाता आला पाहिजे अशाच पद्धतीने त्यांनी मेहनत घेतली आहे. अस्सल रागदारीवर आधारित गाणी, नाट्यगीते, लावणी, पारंपरिक स्त्री–गीते, बालगीते, भक्तिगीते, देशभक्तिगीते, अंगाईगीते, पाश्चिमात्य ढंगाची गाणी इत्यादींचा त्यांचा गायनप्रवास थक्क करणारा आहे.

'गोकुळचा राजा', (संगीत : पुरुषोत्तम सोळांकुरकर), 'स्वराज्याचा शिलेदार' व 'शिवा रामोशी' (संगीत : दत्ता डावजेकर) हे त्यांचे काही सुरुवातीचे चित्रपट होत. हळूहळू मराठीमधील सारेच संगीतकार आशा भोसले यांचा आवाज प्रामुख्याने वापरू लागले.

याच सुमारास आशा भोसले यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढत होत्या. हेमंत, वर्षा आणि आनंद या तीन मुलांच्या त्या आता आई होत्या आणि मुलांना वाढवत त्या एकीकडे पार्श्वगायन करीत होत्या. आपण फारसे शालेय शिक्षण घेतले नसले तरी आपल्या मुलांनी उत्तम शिक्षण घ्यावे असा त्यांचा कटाक्ष असे. त्यांना २००० साली दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. भारत सरकारने २००८मध्ये पद्मविभूषण या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. मध्यप्रदेश (१९८९), महाराष्ट्र (१९९९) शासनांचे 'लता मंगेशकर' पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. आजही त्यांचा आवाज तरुण आहे आणि त्यांचा गाण्याचा उत्साह तरुणांना लाजवेल असा आहे. **–अद्वैत धर्माधिकारी**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# साध्यासोप्या गोष्टींमुळे मधुमेह नियंत्रणात येऊ शकतो...

जीवनशैलीतील योग्य बदलांमुळे प्री–डायबेटिस म्हणजेच मधुमेहपूर्व स्थिती नियंत्रणात येत असल्याचे पुण्यातील 'फ्रीडम फ्रॉम डायबेटिस संस्थे'ने केलेल्या अभ्यासातून समोर आले आहे. संस्थेने ४२७ रुग्णांवर तीन वर्षे चाचण्या करून हा निष्कर्ष काढला आहे. या संशोधनामुळे मधुमेहपूर्व स्थितीतील रुग्णांसाठी आशेचा किरण निर्माण झाला आहे. हे संशोधन 'जर्नल ऑफ डायबेटिस रिसर्च'मध्ये प्रसिद्ध झाले आहे.



देशातील ८९ शहरांतील १८ ते ७५ वयोगटाचील ४२७ रुग्णांचा यात समावेश होता. हे सर्व रुग्ण मधुमेहपूर्व स्थितीतील होते. त्यांची तीन महिन्यांतील सरासरी रक्तशर्करा पातळी म्हणजेच एचबीए१सी ५.७ ते ६.४ टक्के होती आणि ते इन्शुलीन घेत नव्हते. या रुग्णांचा एक वर्षांचा ऑनलाइन जीवनशैली सुधार कार्यक्रम घेण्यात आला. यात वनस्पतीजन्य आहार, शारीरिक व्यायाम, मानसिक आधार आणि वैद्यकीय व्यवस्थापन यांचा समावेश होता. सुरुवातीला या रुग्णांच्या शरीराचा आकार, वजन यांचे मोजमाप करण्यात आले. याचबरोबर रुग्णाचे रक्त, लघवी अथवा पेशींमधील साखरेची पातळी तपासण्यात आली.

या रुग्णांचा वर्षभराचा जीवनशैली सुधार कार्यक्रम संपल्यानंतर ४७.१ टक्के रुग्ण हे मधुमेहपूर्व स्थितीतून बाहेर पडल्याचे निष्पन्न झाले. याचबरोबर त्यांचे वजनही कमी होऊन त्यांच्या एचबीए१सी पातळीत सुधारणा झाली होती. तसेच, त्यांच्या रक्तातील शर्करेची पातळी, बॉडी मास इंडेक्स आणि रक्तदाबामध्येही सुधारणा आढळून आली.

विशेष म्हणजे या रुग्णांपैकी ३४ टक्के रुग्णांचे सरासरी १० टक्के वजन कमी झाले. पुरुषांपेक्षा महिला रुग्णांचे वजन जास्त कमी झाल्याचे या अभ्यासातून समोर आले. या अभ्यासामध्ये डॉ. प्रमोद त्रिपाठी यांच्यासह डॉ. दीप्तीका तिवारी, डॉ. निधी कदम, डॉ.अनघा व्यवहारे, डॉ. बेबी शर्मा, डॉ. तेजस काथरीकोली, डॉ. मल्हार गानला व डॉ. बंशी साबू यांचा समावेश होता.

अर्ध्या रुग्णांमध्ये सुधारणा फ्रीडम फ्रॉम डायबेटिसचे संस्थापक डॉ. प्रमोद त्रिपाठी म्हणाले की, भारतात मधुमेहपूर्व स्थिती ही वाढती चिंता असून, त्याचे प्रमाण अंदाजे १५ टक्के आहे. आपल्या जीवनशैलीत सुधारणा करून त्यावर नियंत्रण मिळवता येते. या अभ्यासाचे उद्दिष्ट एकात्मिक जीवनशैलीच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे हा होता. यात जवळपास अर्ध्या रुग्णांमध्ये सुधारणा दिसून आली.

# जिल्ह्यात अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाला भावपूर्ण निरोप

## श्रीवर्धनमध्ये विसर्जन सोहळ्याने वातावरण भारावले



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहर आणि परिसरात अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाच्या विसर्जन सोहळ्याने भक्तिभाव आणि उत्साहाची पराकाष्ठा गाठली. पाच दिवसांच्या आनंदसोहळ्यानंतर लाडक्या बाप्पाला निरोप देताना प्रत्येक भक्ताच्या डोळ्यांत पाणी तर ओठांवर गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर याचा गजर होता.

सकाळपासूनच गणेशमूर्ती विसर्जनासाठी भक्तांची लगबग सुरू झाली होती. टाळ-मृदुंग, ढोल-ताशांच्या गजरात वाजतगाजत मिरवणुका निघाल्या. टाळ्या, चिपळ्या, बँडबाज्यांचे सूर आणि डीजेच्या तालावर ठेका धरत तरुणाईने सोहळ्याला रंगत आणली. रस्त्यांवर सजावट, फुलांची आरास, फटाक्यांची आतषबाजी आणि उत्साहाचा जल्लोष यामुळे वातावरण प्रसन्न झाले.

मार्गभर गणेशभक्त गणपती बाप्पा मोरयाचे गजर करत होते. काही ठिकाणी भक्तिमय भजने, काही ठिकाणी पारंपारिक गजरी, तर काही ठिकाणी सामाजिक संदेश देणारे देखावे यामुळे विसर्जन मिरवणूक अधिकच आकर्षक ठरली

समुद्रकिनारी शेकडो भाविकांच्या उपस्थितीत विसर्जन सोहळा पार पडला. आतषबाजीच्या उजेडात, समुद्राच्या लाटांच्या साक्षीने आणि भाविकांच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी हा निरोप अविस्मरणीय ठरला.स्थानिक प्रशासन, पोलीस विभाग आणि स्वयंसेवी संस्थांनी सुरक्षेची काटेकोर व्यवस्था केली होती. वाहतुकीसाठी विशेष मार्ग आखण्यात आले होते, तर स्वयंसेवकांनी शिस्त राखली.

## माणगावात दहा दिवसांच्या गणपतींचे उत्साहात विसर्जन


**माणगाव : प्रतिनिधी**

अनंत चतुर्थी दिवशी दुपार पासूनच विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी व गणेश भक्तांनी आपले दहा दिवसांचे सार्वजनिक गणपती व घरगुती गणपती विसर्जनासाठी बाहेर काढले. सायंकाळी मोठ्या संख्येने दहा दिवसांचे गणपती विसर्जनासाठी आले होते.

माणगावातील प्रसिद्ध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा साईनगराचा राजा,जय हनुमान मित्र मंडळ उतेखोलवाडीचा गणराय,एकलव्य मित्रमंडळ नाणोरे आदिवासीवाडीचा गणराय,माणगाव बसस्थानकातील गणराय, ढालघरचा राजा हे एक आकर्षण होते. विविध मंडळातील तसेच घरगुती गणरायांच्या पुरुष व महिला गणेशभक्त डीजे च्या आवाजात नाचत मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी माणगाव नगरपंचायतीतर्फे नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे ,माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार,माजी नगराध्यक्ष आनंद यादव,उपनगराध्यक्ष हर्षदा काळे,सर्व नगरसेवक, नगरसेविका,मुख्याधिकारी संतोष माळी,नगरपंचायतीचे कर्मचारी तसेच माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गणेश भक्तांचे स्वागत केले.

विसर्जन ठिकाणी माणगाव नागरपंचायतीतर्फे गणेश भक्तांना पर्यावरण पूरक गणेशोत्सव अंतर्गत कृत्रिम विसर्जन तलावाचा उपयोग करून पर्यावरणाचे रक्षण करा, माझी वसुंधरा, स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत निर्माल्य येथे टाकावे. असा संदेश असा संदेश देण्यात आला होता.



## रोहा तालुक्यात १० दिवसांच्या गणरायाला निरोप

**रोहे : प्रतिनिधी**

सार्वजनिक गणरायासह रोहा तालुक्यातील घरगुती गणरायाला गणेशभक्तांकडुन भावपूर्ण निरोप देण्यात आले. रोहा शहरातील रोह्याचा राजा व भुवनेश्वर येथील भुवनेश्वर राजा ची भव्य विसर्जन मिरवणूक रोहा शहरातुन काढण्यात आली होती.

शनिवारी सायंकाळी गणरायाच्या विसर्जनाची लगबग रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सुरू झाली होती.रोहा शहरातील गणपतीचे पारंपारिक वाद्यवृंद खालुबाजा, ताशा, ढोल ताशा व पाश्चिमात्य संगीतावर भव्य अशी मिरवणूक ठिक ठिकाणी काढण्यात आली होती. या मिरवणुकीत



बालगोपाळाचा वयोवृध्द व महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशी अर्थ हाक भावीक देताना दिसत होते. ठीक ठिकाणी मिरवणुकीमध्ये महिला सह तरुण व वयोवृद्ध बालगोपाळ ठेका धरताना दिसले.

राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांनीही विसर्जनाच्या मिरवणुकीच्या ठिकाणी येत यावेळी गणरायाचे दर्शन घेतले.सार्वजनिक गणेशोत्सव सह वैयक्तिक दहा दिवसांच्या गणरायाचे मोठ्या भक्ती भावाने विसर्जन करण्यात आले. जड अंतकरणाने लाडक्या बाप्पाला रोहेकरांनी भावपूर्ण निरोप दिला आहे. रात्री उशिरापर्यंत गणेश विसर्जन सुरु होते.

रोहा शहरासह तालुक्यातील कोलाड, सुतारवाडी, खांब, नागोठणे, मेढा, देवकान्हे, यशवंतखार, धाटाव, चणेरा, घोसाळे आदी ग्रामीण भागात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आले गणपती विसर्जन घाट नगरपरिषदेच्या वतीने येथे लाईटची व्यवस्था करण्यात आली होती. मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले होते.कर्मचारी विसर्जन घाट येथे गणरायाचे स्वागत करीत त्यांनी निर्माल्या ही जमा केले. गणपती विसर्जनासाठी कृत्रिम कुंड तयार करण्यात आले होते.

## तळा शहरासह ग्रामीण भागात बाप्पाला भावपूर्ण निरोप

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील ग्रामीण भागातील व शहरीभागातील अनंतचतुर्दशी पर्यंतच्या बाप्पांना गणेशभक्तांनी भावपूर्ण निरोप. दिला तालुक्यातील गिरणे विभाग, पढवणविभाग,मजगावविभाग, तळेगाव विभाग,महागाव विभाग, पिटसई विभाग, मांदाड विभाग,सोनसडे विभाग व तळानगरपंचात विभाग व बाजारपेठेतील अनंतचतुर्दशी पर्यतच्या श्रीगणेशाच्या मिरवणूका या तीन ते चारच्या दरम्यान निघण्यास सुरूवात झाली. या मिरवणुकीत



विशेष म्हणजे पारंपारिक पद्धतीने व पारंपारिक वाद्यांचा वापर अधिक प्रमाणात केल्याचे पहावयास मिळाले.

टाळ,ढोलकी,नाळ,व इतर वाद्यांचा वापर करत भजन,अभंग म्हणत मोठ्या भक्तीमय वातावरणात मिरवणूका काढण्यात आल्या एखादं दुसऱ्या ठिकाणी बेंन्जो अथवा डिजेचा वापर करण्यात आला होता मोठ्या भक्तिभावाने बाप्पाला भक्तगणांनी निरोप देत.गणपत्ती बाप्पा मोरया,पुढल्या वर्षी लवकर या.म्हणत निरोप दिला. पोलिस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

## पालीत डीजे व लेझीमच्या तालावर गणपतीला निरोप

**पाली: प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत दहा दिवसांच्या गणरायाला शनिवारी (ता.६) भावपूर्ण निरोप देण्यात आला. गणरायाच्या आरत्या व सांस्कृतिक कार्यक्रमांनी मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. गणपती गेले गावाला चैन पडेना आम्हाला, पुढच्या वर्षी लवकर या अशा जयघोषात तसेच डीजेच्या ठेक्यावर आणि लेझीमच्या तालावर वाजत गाजत नाचत गणरायाला विसर्जनासाठी नेण्यात आले. विसर्जनावेळी पावसाने हजेरी लावली होती. मात्र भक्तांचा उत्साह कुठेही ओसरला नाही.

विसर्जन मिरवणुकीसाठी पाली पोलीस स्टेशनच्या वतीने



चोख बंदोबस्त व नियोजन करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्या नेतृत्वाखाली शहरातील प्रमुख चौक, घाट परिसर व विसर्जन स्थळांवर पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. वाहतूक नियंत्रण व सुरक्षा उपाययोजना प्रभावीपणे राबवण्यात आल्या. पोलीस, स्थानिक स्वयंसेवक, महसूल प्रशासन व नगरपंचायत यांचा समन्वय होता नगरपंचायतीच्या वतीने विसर्जन स्थळांवर स्वच्छता करून मंडप बांधण्यात आले होते.

## पोलादपूरचा राजा सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणूक दिमाखदार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

अनंत चतुर्दशीला विविध ठिकाणचे सार्वजनिक व खाजगी गणेश मूर्तींचे विसर्जन सुरू असताना पोलादपूर शहरातील पोलादपूर चा राजा सार्वजनिक गणेशमुर्तीची विसर्जन मिरवणुक दिमाखदार सोहळा ठरली. रविवारी पोलादपूर पोलीस स्टेशनच्या राजा देखील विसर्जनासाठी मार्गस्थ झाला.



पोलादपूरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सवाचे अध्यक्ष दर्पण दरेकर, कार्याध्यक्ष स्वप्निल भुवड, उपाध्यक्ष सनी विचारे व महेश निकम, सचिव अमरदीप नगरकर, सहसचिव प्रवीण पांडे, खजिनदार प्रतीक सुर्वे, सह खजिनदार आदेश गायकवाड सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे असंख्य कार्यकर्ते व माजी पदाधिकारी, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, तालुका नेते प्रसन्न पालांडे, तालुका अध्यक्ष वैभव चांदे, नगराध्यक्षा शिल्पा दरेकर, समाजासेवक दीपक हरीभाऊ उतेकर, नगरसेवक विनायक दीक्षित, राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक नेते नगरसेवक दिलीप भागवत, मनसे शहर उपाध्यक्ष मुश्ताक मुजावर यांनी विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन मिरवणूक सद्भावनेसह पार पाडण्यात मदत केली.

विसर्जन मिरवणुकीमध्ये चोचिंदे येथील लेझीम पथकाचे शिस्तबद्ध सादरीकरण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर तरुण तरुणींचे शिवकालीन मर्दानी खेळांचे सादरीकरण झाले. यानंतर मुस्लीम समाजबांधवांनी पोलादपूरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष दर्पण दरेकर यांचा सत्कार करुन सर्व गणेशभक्तांना शीतपेयांचे मोफत वाटप केले. उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पात्रात पोलादपूरच्या राजाचे सामुदायिक महाआरती करून विसर्जन करीत निरोप दिला.

## अनंत चतुर्दशीच्या बाप्पांना म्हसळ्यात भावपूर्ण निरोप



**प्रतिनिधी: म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील अनंत चतुर्दशीच्या बाप्पांचे आज उत्साही वातावरणात पारंपरिक ढोल -ताशांच्या गजरात,फटाक्यांच्या आतषबाजी मध्ये विसर्जन करण्यात आले. यावेळी तालुक्यातील वंजारी समाजाचा एकमेव सार्वजनिक मंडळ आणि शहरांत ७५ आणि५७५खाजगी गणेशाचे भावपूर्ण धार्मिक वातावरणांत निरोप देण्यात आले. शहरासह, तालुक्यांतील सर्वच गावांतील विसर्जन यात्रेत महिलांचा विशेष सहभाग, उत्साह दिसत होत्या, शहरांतील राजस्थानी राजपूत समाजांतील

गताकुंवर, चंद्राकुवर, संतोषकुंवर,स्वप्नाकुंवर, रोषनाकुँवर,हवाँकुंवर, भवरकुंवर, निकिता, सोनू, बींटू या महिला वर्गानी सहभाग घेऊन बहुतांश मूर्तींना फूले-अक्षता अर्पण करून गजाननाचा आदर केला म्हसळा शहरांत संमीश्र वस्ती, बाजारपेठेतील मुख्य रस्तेअरुंद आशा स्थितींत सहपोलीस निरीक्षक संदीप कहाळे यानी तीन पोलीस उप-निरीक्षक, पोलीस कर्मचारी-होमगार्ड यांच्या मदतीनी चोख बंदोबस्त पार पाडला.

विसर्जनांत म्हसळा शहर, सुरई,म्हसळा आदिवासी वाडी,म्हसळा गौळवाड़ी येथील उंच,पारंपारिक वेशांतील आणि देखण्या मूर्तींचा समावेश होता .विसर्जन मिरवणुकीत आबाल-वृद्ध सारेच उत्साहात आणि आनंदात सहभागी झाले होते.

## मुस्लिम समाजाच्या रक्तदान शिबिरात ३० जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाच्या वतीने ईद - ए - मिलाद निमित्त समर्पण रक्त केंद्र घाटकोपरच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत - खालापुर तालुक्यातील ५२३ वे भव्य रक्तदान शिबिर होते.

कर्जत शहरातील मुस्लिम मस्जिद मधील सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुनिल गोगटे, भाजपा जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन जिल्हाध्यक्ष कैलास पोटे, डॉ. प्रशांत



सदावर्ते, मुस्लिम समाज अध्यक्ष सैदु शेख, उपाध्यक्ष अब्बास शेख, शाहनवाज हुसेन मुल्ला, नसारभाई शेख, अमिर मणियार, महेंद्र चंदन, अरविंद जैन, प्रकाशकुमार जैन आदी उपस्थित होते.

या शिबिरात सर्वप्रथम नवाज तांबोळी यांनी करून रक्तदान शिबिराची सरुवात केली. रक्तसंकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्त केंद्राचे डॉ. रमेश सिंग, लता देशक, योगेश सर व इतर कर्मचाऱ्यांनी उत्तम केले. एकूण ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. माजी नगराध्यक्ष अशोक ओसवाल, माजी उपनगराध्यक्ष राहुल डाळिंबकर, माजी नगरसेवक संतोष पाटील, योगेश गायकवाड आदींनी शिबिराला भेट दिली. या वेळी संजीव ठाकरे, सचिन भालेराव ,सलीम जळगावकर, हैदर शेख, अब्दुल रहमान मुल्ला, रमजान शेख, मोजम पानसरे, जरूर शेख, जमीर शेख, खालील जळगावकर, रहीम मुल्ला, सलीम अन्सारी, कलीम मुल्ला, खुदबुददीन शेख, नवाज तांबोळी, राजीव पवार, बिलाल आढाळ, शादाब शेख, जावेद शेख, शेरवान पठाण आदी उपस्थित होते.

## जांभूळपाड्यात विजेचा शॉक लागून चार जनावरांचा मृत्यू

**पाली: प्रतिनिधी**

रायगडच्या सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा हद्दीत विजयनगर गावाजवळ वीज वाहिनी तुटून विजेचा शॉक बसल्याने दूध व्यावसायिकाच्या तीन म्हशी व एक गाय मरण पावल्याची घटना शुक्रवारी (ता. ५) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास घडली. त्यामुळे यात दूध व्यावसायिक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले` आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेल्या आठ दिवसांपूर्वी विजयनगर येथे विजेच्या खांबावरील वीज प्रवाह चालू असलेली वीज वहिनी तुटून जमिनीवर गवतात पडल्याच्या अवस्थेत स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आली. सदरची बाब तात्काळ नागरिकांनी महावितरणच्या कर्मचाऱ्यांना कळवली.

परंतु याकडे महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्याने शुक्रवारी (ता. ५) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ३ म्हशी व ३ गाय या दुधाळ जनावरांना तुटलेल्या विज वाहिनीचा जबर धक्का लागून मृत्यू झाल्याने नुकसान भरपाइची मागणी केली आहे



**सदर ठिकाणी विजेच्या पोल खांबावरील एलटी वायरचा कंडक्टर तुटल्याने वीज वाहिनी तुटून खाली पडली त्यामुळे जनावरांना विजेचा धक्का बसला व यात शेतकऱ्यांची दुधाळ जनावरे मरण पावली. घटनास्थळी उपशाखा अभियंता श्री. भंडारे यांना तात्काळ पाठविण्यात सदर ठिकाणचा पंचनामा करण्यास सांगितले आहे.-**

**बालाजी चात्रे, शाखा अभियंता, पाली सुधागड.**

## निवडक

### ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

**पनवेल :** ज्येष्ठ नागरिकांना पोलीस असल्याची बतावणी करून लुटण्याचे सत्र सुरूच असून वावंजे येथे एका ज्येष्ठ नागरिकाला फसवण्यात आले आहे. वावंजे गावात राहणाऱ्या ६५ वर्षीय व्यक्तीला त्रिकुटाने फसवले. बोलण्यात गुंतवून पोलीस असल्याचे भासवत सोन्याचे दागिने लंपास केले. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अडीच लाख रुपयांचे दागिने फसवणुकीची तक्रार नोंदविण्यात आली आहे.

### अजित जोशी यांना पुरस्कार

**उरण :** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागामार्फत



देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. यात उरण तालुक्यातील पिरकोन गावचे सुपुत्र शिक्षक अजित जोशी यांना रायगड जिल्हा परिषदे तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळणार असल्याचे जाहीर झाले आहे. अनेकांनी व्हॉट्सअॅप, फेसबुक, ट्विटर आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून शिक्षक अजित जोशी यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### उमाजी नाईक यांना अभिवादन

**नवी मुंबई :** भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ब्रिटीश सत्तेविरोधात लढणारे पहिले सशस्त्र क्रांतीकारक उमाजी नाईक यांच्या जयंतीदिनी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात म्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे यांच्या हस्ते अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन झाले.



**रसायनी : आपटा गावातील सार्वजनिक व घरगुती गणपतींचे अनंत चतुर्दशीच्या दिवशी वाजत गाजत भक्ती भावाने विसर्जन करण्यात आले. पाताळगंगा नदीच्या काठावर येवून व एकत्रितपणे आरती करून त्यांना बापूजी देवस्थान येथील घाटावरून नदीमध्ये विसर्जन करण्यात आले.**

# शाळा, महाविद्यालयांमध्ये शिक्षक दिन उत्साहात

## विशेष मुलांच्या शाळेत सन्मान सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

नॉर्मल मुलांना ज्ञानाचे धडे देताना फारशा अडचणी येत नाही, परंतु बौद्धिकदृष्ट्या असक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक, मानसिक दृष्ट्या सक्षम करण्याचे खूप कठीण काम असते. डॉ नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचलित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेतील शिक्षकांनी हे आव्हान स्वीकारू ते ज्ञानदानाचे काम करीत आहे. त्यांचा संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून सन्मान करण्यात आला.



बौद्धिक अक्षम विद्यार्थी म्हणजे ज्यांची बुद्धीची वाढ मर्यादित असते आणि ज्यांना शिकणे, विचार करणे व समस्या सोडवणे यांसारख्या संज्ञानात्मक क्षमतांमध्ये अडचणी येतात. 'बौद्धिक अपंगत्वाची तीव्रता सौम्य ते गंभीर असू शकते आणि त्याची कारणे जन्मापूर्वी, जन्मावेळी किंवा जन्मानंतर असू शकतात. अशा मुलांना शिकण्याची क्षमता, तार्किक विचार करणे, स्मरणशक्ती आणि एकाग्रता यांसारख्या गोष्टींमध्ये अडथळे येतात. अशा बौद्धिकदृष्ट्या असक्षम मुलांची शाळा नवीन पनवेल येथे डॉ नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशनच्या माध्यमातून चालवली जाते. एकूण एकूण ११३ विद्यार्थी आहेत. या ठिकाणी १४ शिक्षक ज्ञानदानाचे काम करतात. मुलांना संवाद, जीवनावश्यक कौशल्य, रोजचे कार्य, गणित, सामाजिक अनुकूल कौशल्य असे दैनंदिन जीवनात आवश्यक विषय शिकवले जातात. नृत्य, गायन, चित्रकला, हस्तकला, नृत्य यासारख्या कलागुणांना सुद्धा वाव दिला जातो. कला कौशल्याचा वापर करून पुर्व व्यावसायिक प्रशिक्षण सुद्धा शिक्षक देतात.

१८ वर्षावरील विद्यार्थी शाळेत शिकवल्या गेलेल्या पूर्व व्यावसायिक कौशल्यांच्या आधारावर विविध व्यवसाय पालकांसोबत करतात. अगरबत्ती बनवून विकणे, कापडी फुले बनविणे, क्रोशा वर्कच्या या वस्तू विकणे किरणा मालाचे दुकान, सुपर मार्केट,स्क्रीन प्रिंटिंग, बुक बाईंडिंग वस्तू पॅकिंग या ठिकाणी ते काम करू शकतात. या बौद्धिक असक्षम विद्यार्थ्यांना सक्षम करण्याची मोठी जबाबदारी विशेष शाळेतील शिक्षक पार पाडतात. त्यांच्या कार्याचा गौरव शनिवारी ६ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून वैशाली जगदाळे यांनी संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून केला. या वेळी मुख्याध्यापिका श्रेया नंदकुमार जाधव, संकल्पच्या सभासद उज्वला जाधव पल्लवी एरंडे उपस्थित होत्या.

## समाज घडविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार



**नवी मुंबई : बातमीदार**

रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई लिंक टाऊन ऐरोली व इनरव्हील क्लब ऐरोली यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १०३ येथे नेशन बिल्डर आवार्ड कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या वेळी समाज घडविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. रोटरी क्लब ऐरोली यांचे रौप्यमहोत्सवी वर्ष असून सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या नवीमुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे व शिक्षणाधिकारी सुलभा बारघारे उपस्थित होत्या.

नवी मुंबईतील ऐरोली घणसोली विभागातील २७ नामांकित शिक्षकांना नेशन बिल्डर आवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास रोटरी डिस्ट्रिक्ट लिटरेशी प्रमुख विनया, डिस्ट्रिक्ट होकेशनल जॉईंट डायरेक्टर लीलाधर पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

कार्यक्रम क्लब प्रेसिडेंट प्रशांत गडेवार, क्लब सेक्रटरी अनिल लाड, मुरलीधर नायर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला तसेच प्रदीप मकसूद आणि डॉ. विशाखा परुळेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## स्टर्लिंग महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा



**नवी मुंबई : बातमीदार**

स्टर्लिंग आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात ४ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सांस्कृतिक समिती, एनएसएस युनिट आणि डीएलएलई विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात इंडसइंड बँकेच्या प्रतिनिधींनी आयोजित केलेल्या फायनान्शियल लिटरसी सेशनने झाली. यामध्ये शिक्षकांना बचत व गुंतवणूक योजना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शेवटी शिक्षकांसाठी मनोरंजक खेळ, कॅरिकेचर स्टॉल तसेच अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी स्टर्लिंग महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ, रवी कुमार वर्मा यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक ऋचा चंद्रा, राणी खतावळे, गणेश सुर्यवंशी, अस्मिता गोडे, अनिकेतन सुतार, हेमंत पाटील, डॉली पांडे, इंदुराकुश मन्ने, आदर्श मित्र वर्मा, रेश्मा एतम, मनीषा लांडगे, अलीशा पवार व इंदिरा चौधरी यांनी परिश्रम घेतले.

## रोटरी क्लब खारघर मिडटाऊनतर्फे शिक्षकांचा सन्मान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

शिक्षक दिनानिमित्त रोटरी क्लब खारघर मिडटाऊन तर्फे ६ सप्टेंबर रोजी खारघर आणि परिसरातील शिक्षकांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच १० वी व १२ वीमध्ये उत्तम गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

या वेळी रोटरीचे माजी गव्हर्नर व प्रसिद्ध डॉक्टर डॉ. शैलेश पालेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिक्षकांचे आपल्या सर्वांच्या आयुष्यामध्ये किती महत्त्वाचे स्थान आहे याविषयी विवेचन केले. रोटरी आणि रोटरीचे कार्य याबद्दलही माहिती दिली. या वेळी रोटरी अध्यक्ष डॉ. रविकिरण, सचिव रो सुप्रिया सावंत आणि रोटरी सदस्य, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.






**पनवेल : भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांच्या आसुडगाव येथील गणरायाचे विसर्जनापूर्वी दर्शन घेतले. या वेळी मनोहर म्हात्रे उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप मध्यवर्ती कार्यालयातील विराजमान गणरायाचे शनिवारी विसर्जन करण्यात आले.**



**पनवेल : कोळीवाडा गणेशमूर्ती विसर्जन घाट येथे माजी नगरसेविका दर्शना भोईर मॅडम, मंदार देसाई, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर, रोशन माळी, योगेश कोळी आदी उपस्थित होते.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात माजी विद्यार्थी संमेलन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेतर्फे शनिवारी (दि.६) माजी विद्यार्थ्यांसाठी बैठकीचे आयोजन केले होते.



महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी आपल्या भाषणात माजी विद्यार्थ्यांचे योगदान विद्यालयाच्या विकासात किती मोलाचे आहे हे अधोरेखित केले. या वेळी माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक प्रा. महेश धायगुडे यांनी गेल्या वर्षातील उपक्रमांचा आढावा घेतला आणि आगामी योजना जाहीर केल्या. या सभेत महाविद्यालयाचे माजी विद्यार्थ्यां मधुर कोळी व अर्फत खामकर तसेच विविध क्षेत्रात यशस्वी झालेले माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी त्यांनी महाविद्यालयाच्या उत्कर्षासाठी वेगवेगळ्या सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणीय उपक्रमांसाठी भविष्यात आपले सहकार्य असेल हे नमूद केले तसेच इतर सर्व माजी विद्यार्थ्यांनी संस्थेला सहकार्य करण्याची तयारी दर्शवली.

या कार्यक्रमाचे संयोजनामध्ये माजी विद्यार्थी संघटनेतील इतर सर्व सदस्य यांनी त्यांची जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली व उपस्थित इतर सर्व माजी विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम संस्मरणीय ठरल्याची भावना व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## वहाळजवळील खाडी ब्रिजखाली आढळला मृतदेह

**पनवेल :** जवळील वहाळ येथील खाडी ब्रिजच्या खाली एक व्यक्तीचा मृतदेह आढळला आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध उलवा पोलीस करीत आहेत.

उलवा पोलीस ठाणे हद्दीत एक ३० वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. या एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ३० वर्ष, उंची १६५ सेंमी, बांधा मध्यम, चेहरा गोल, केस काळे वाढलेले (पाण्यामुळे गळालेले), डोळे बंद, तोंड उघडे व जीभ बाहेर आलेली, नेसून राखाडी रंगाचा फुल बाह्याचा बटणाचा शर्ट, काळ्या रंगाची ट्रॅकपँट व त्यास लाल रंगाची नाडी असलेली तसेच त्यावर TUM असे इंग्रजीमध्ये लिहलेले. तसेच उजव्या हातावर माऊली असे मराठीमध्ये गोंदलेले उजवे हातामध्ये धागा व ताबिज बांधलेला, डावे हाताचे अंगठ्याजवळ गोंदलेले आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्या त्यांनी उलवा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरक्षक पोफले यांच्याशी ९८२११८१२९६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## उरणमध्ये भातपिकांना सुरळीच्या अळीचा धोका

### कृषी सहाय्यकांचे औषध फवारणीचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून सततच्या पावसामुळे भातशेतीला सुरळीच्या अळीचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे येथील शेतकरी चिंताग्रस्त झाले असून, भातशेती आडवी होण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे. जुलै, ऑगष्ट महिन्यात पावसाने दडी मारल्याने उष्णता वाढली होती. तर सध्या सततच्या पावसामुळे भातशेतीला उष्णता मिळत नसल्याने पिकावर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



मे महिन्यात झालेल्या पावसात शेतकऱ्यांच्या पेरण्या वाया गेल्या होत्या. त्यानंतर पावसाने दडी मारली होती. तर दुसरीकडे शेतकऱ्यांनी अगदी मेहेनतीने उभे केलेले पिक सध्या धोक्यात आले आहे. याबाबत शासन आणि कृषिविभागाने उपाययोजना करण्याचा विचार करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. उरण तालूका एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता, मात्र वाढत्या औद्योगिकी करणामुळे तालुक्यात भात शेतीची लागवडीचे क्षेत्र कमी झाले आहे.

उरण तालुक्यात आजही पारंपरिक पद्धतीने भातशेती केली जाते, मात्र पावसामुळे काही ठिकाणी खरीप हंगामातील भातपेरणी हवीताशी न झाल्यामुळे भाताची रोपे उगवलीच नाहीत. मूळ पेरणीला संधी न मिळाल्याने शेतीला उन्हाची ऊब आवश्यक आहे,ती उबच शेतात साचलेल्या पावसाच्या पाण्यामुळे मिळाली नाही. त्यामुळे भात रोपांची अवस्था बिकट झाली आहे. यंदाच्या वर्षी सततच्या पावसामुळे जमिनीत ओलावा राहिल्याने रोपांच्या उगवण क्षमतेवर परिणाम झाला असून काही ठिकाणी उगवलेली रोपे फार कमकुवत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.महागडे बियाणे, वाढत्या मजुरीचे दर आणि भाताची रोपे कुजून गेल्याने बहुतांशी शेतकरी येत्या वर्षी भातशेती ओसाड ठेवणार आहेत.

यंदाच्या वर्षी पावसाला मे महिन्यात सुरुवात झाल्याने पेरणी वाया गेली. भातरोपे तयार न होताच बियाणे कुजून गेले. असे असतांना देखील येथील शेतकऱ्यांनी दुबार पेरणी केली, मात्र पाऊस थांबत नसल्याने तेही भात बियाण्याचे पिक कुजून गेले आहे. सतत मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने गारवा निर्माण झाला आहे. याचा परिणाम भातपिकावर होत आहे.

**शेतात पाणी साचून राहिल्याने भातपिकावर सुरळीच्या अळी पडत असेल तर कृषि सेवा येथून औषध घेऊन त्याची मात्रा प्रमाणात देण्यात यावे यासाठी उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात तक्ता लावण्यात आला आहे.**

**–सुषमा गायकवाड, कृषी सहाय्यक, चिरनेर**

## मेट्रो मार्ग क्र. १ने गाठला एक कोटी प्रवासी संख्येचा टप्पा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर मार्गावरील प्रवासी संख्येने, मेट्रो मार्गाचे परिचालन सुरू झाल्यापासून, ६ सप्टेंबर २०२५ रोजी विक्रमी एक कोटी प्रवासी संख्येचा टप्पा अवघ्या दोन वर्षांत गाठला आहे.

मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर मार्गाची अंमलबजाणी सर्वप्रथम करण्यात येऊन या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३ रोजी मेट्रोचे परिचालन सुरू झाले. सीबीडी बेलापूर परिसरातील शासकीय कार्यालये, तळोजा एमआयडीसी, खारघर व तळोजा परिसरातील सिडकोची गृहसंकुले यांना कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याकरिता हा मार्ग महत्त्वपूर्ण ठरला आहे. सध्या गर्दीच्या वेळी दर १० मिनिटांनी बेलापूर व तळोजा स्थानकांदरम्यान दोन्ही दिशांना मेट्रोच्या फेऱ्या उपलब्ध आहेत. तर उर्वरित वेळांमध्ये दर पंधरा मिनिटांनी मेट्रोची फेरी उपलब्ध आहे. मेट्रोच्या तिकिट दरात तब्बल ३३ टक्के कपात करण्यात येऊन सध्या तिकिटाचा किमान दर रु. १० कमाल रु. ३० इतका आहे.

# मोफत सीबीएससीचे शिक्षण देणार -मंत्री भरत गोगावले



**माणगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षण आणि आरोग्याच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात, यासाठी जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे संस्थापक तसेच शिवसेना उपनेते निलेश सांबरे यांनी पुढाकार घेतला आहे. कांही लोक एखाद्या विद्यार्थ्याची फी कमी करण्यास सांगितल्या नंतरही ते कमी करीत नाहीत इथल्या काही लोकांची मक्तेदारी आहे ती आम्ही मोडून काढणार आहोत. असा टोला रोजगारहमी व फलोत्पादन मंत्री ना. भरतशेठ गोगावले यांनी कुणाचेही नाव न घेता मारला. ते म्हणाले गरीब मुलांनाही दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण उच्च दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे या उद्देशाने त्यांनी लवकरच मोफत सीबीएससी शाळा सुरू करण्याची घोषणा केली. रायगड जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांत अशी शाळा उभारण्याचा त्यांचा संकल्प असून त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला संस्था कार्याध्यक्ष धीरज सांबरे, संपर्कप्रमुख अरुण चाळके, महिला जिल्हासंघटिका निलीमा घोसाळकर, माजी जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, उपजिल्हाप्रमुख रमेश मोरे, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, तालुकाप्रमुख महेंद्र मानकर, जिजाऊ संस्थेचे निलेश म्हात्रे,उमेश यादव,नितीन शेलार यांच्यासह संस्थेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याचाच एक भाग म्हणून माणगाव तालुक्यासाठी मोफत रुग्णवाहिका व मोफत दवाखाना, विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप तसेच नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर व चष्मे वाटप यांचे लोकार्पण ५ सप्टेंबर रोजी दुपारी २.०० वाजता रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री ना. भरतशेठ गोगावले आणि उपनेते निलेश सांबरे यांच्या हस्ते मोर्बा रोड एसबीआय बँके समोर रॉयल प्लाझा पहिला मजला येथे करण्यात आले. तसेच म्बुलन्स सेवेसाठी नाममात्र डिझेलचा खर्च गरजूंनी टाकल्यास ही रुग्णवाहिका मोफत सेवा अधिक तत्परतेने व जलद गतीने कार्यरत राहील, असे आश्वासन मंत्री भरत गोगावले यांनी या वेळी दिले.

निलेश सांबरे यांनी सांगितले की, गरीब, कष्टकरी व शेतकरी कुटुंबातील मुलांना योग्य शिक्षण मिळाले तर ते सर्वोच्च पदावर पोहोचून समाजाला नवी दिशा देतील आणि त्यामुळे देशाची गरीबी दूर होईल. त्यांनी जाहीर केले की, शिवसेना आणि जिजाऊ संस्था समाजासाठी लागणारी कोणतीही मदत करण्यास आम्ही तत्पर आहोत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री भरत गोगावले हे सतत जनतेचे अश्रू पुसण्याचे काम करत असल्याने त्यांना साथ देणे हे प्रत्येक शिवसैनिकाचे कर्तव्य असल्याचेही त्यांनी म्हटले. इथल्या विद्यार्थी, विद्यार्थिनी थोडेफार शिक्षण न घेता उच्चशिक्षण घेऊन एखाद्या प्रशासनातील अधिकारी बनावे यासाठी आपण त्याला लागेल ती मदत करू असा विश्वास दिला.

# इंदापूर बाजारपेठेत भीषण आग; तीन दुकाने जळून खाक

**माणगाव : बातमीदार**

मुंबई – गोवा हायवे लगत इंदापूर बाजारपेठेत शनिवारी मध्यरात्री १.०० वाजण्याच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे भिषण आग लागली. या आगीत तीन दुकाने जळून खाक झाली असून या मध्ये दुकानदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.



याबाबतचे वृत्त असे की, इंदापूर बाजारपेठेमधील एका नॉव्हेल्टी दुकानात रात्री १.०० वाजण्याच्या सुमारास आग लागल्याचे समजताच या नॉव्हेल्टी मालक हे त्वरित आपल्या दुकानात येऊन त्यांनी दुकान खोलले असता त्याच्या दुकानातून आगीचा भडका निघाला. ही आग एवढी भीषण होती की बाजूला असलेल्या मेडिकल तसेच स्वीट मार्ट या दुकानाने देखील त्वरित पेट घेतल्याने या तिन्ही दुकानातील लाखो रुपयांचा माल जळून खाक झाला असून लाखो रूपयाचे नुकसान झाले आहे.

यावेळी नॉव्हेल्टी दुकानदार श्याम कदम यांनी सांगितले की, माझ्या दुकानातून धूर निघत होता त्यावेळी मी आलो .मी गुगल वर जाऊन माणगांव अग्निशामकला कॉल केला परंतु त्यांनी कॉल उचलला नाही. दुसऱ्यांदा त्यांनी कॉल उचलला त्यावेळी त्यांनी सांगितले की गाडीत पाणी नाही. मग मी रोहा व महाड व येथे कॉल केला त्यावेळी रोहा अग्निशामक दहा ते पंधरा मिंनिटात आले. त्या पाठोपाठ महाडची अग्निशामक आली व नंतर माणगांव अग्निशामक आली. जर माणगांव मधील अग्निशामक वेळेत आली असती तर आमची दुकाने ही शंभर टक्के वाचली असती.

इंदापूर येथे आगीची झालेली दुर्घटना समजताच मंत्री आदीती तटकरे यांनी त्वरित घटनास्थळी दुकानदारांची भेट घेऊन पाहणी करून त्यांच्या तक्रारी प्रमाणे माणगांव नगरपंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चांगलीच हजेरी घेवून कान उघडणी केली.

# बोरघाटात इर्टीका कार दरीत कोसळली; एक ठार, एक जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटातील टाटा पॉवर हाऊस जवळ ईरटीका कार ५० फुट दरीत कोसळली. या अपघातात १ ठार तर १ जण गंभीर जखमीं झाला. जखमीला जाखोटिया हॉस्पिटल खोपोली येथे उपचार सुरू आहेत.

मुंबई येथील २ तरुण पुणे येथे जात असताना रात्री २.३० वा सुमारास अपघात घडला. घटनास्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक गडदे आणि महामार्ग वाहतूक यंत्रणा दाखल होत जखमीला रुग्णालयात दाखल केले. नरेश पटेल २१ गोराई बोरिवली मुंबई असे ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे.



# बँक ऑफ इंडिया कर्जत शाखेला आग

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील महावीर पेठत असलेल्या बँक ऑफ इंडिया शाखेला पहाटेच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत आयटी सर्वर जळाला असून तीन कॉम्प्युटर, टेबल फॅन, प्रिंटर जळाले असून एका टेबलवरील काही कागदपत्रे जळाली आहेत. कर्जत नगरपरिषदेची अग्निशमन बंब लगेचच तेथे पोहोचल्याने आग विझविण्यात आली. अन्यथा मोठा अनर्थ घडला असता.

आज रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास बँकेच्या शाखेला आग लागली. सहाच्या सुमारास बँकेच्या इमारतीतून धूर येत असल्याचे काही नागरिकांच्या लक्षात आले. त्यांनी लगेचच बँक कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला. शाखा व्यवस्थापक गजेंद्र घाडगे, नुकतेच निवृत्त झालेले स्पेशल असिस्टंट दिलीप बडेकर, जयवंत बडेकर घटनास्थळी पोहोचले. त्यांनी दरवाजा उघडल्यानंतर आगीचा भडका झाला. त्यांनी लगेचच अग्निशमन दलाशी संपर्क केला. अग्निशमन दलाचे प्रदीप हिरे यांनी आग विझवली. डिपार्टमेंट मॅनेजर विनीत जाधव हे सुद्धा घटनास्थळी पोहोचले. तर सुरक्षा दलाचे अधिकारी अभिजीत पठारे हे सुद्धा बँकेत आले.

या आगीत आयटी सर्वर जळाला असून तीन कॉम्प्युटर, छोटा टेबल फॅन, एक प्रिंटर आणि एका टेबलवरील काही कागदपत्रे जळाली आहेत. केबल जळल्या आहेत. बँकेचा आतील भाग पूर्णपणे ब्रांच धुराने काळा झाला आहे. ही आग शॉर्ट सर्किटने लागली असावी असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. उद्या सोमवार आहे. बँकेचे कामकाज सुरु करण्याचा आम्ही प्रयत्न क्रित आहोत. तरी नागरिकांनी सहकार्य करावे अशी विनंती शाखा व्यवस्थापक गजेंद्र घाडगे यांनी केली आहे.

# रेवदंड्यात व्यापाऱ्याची भर दिवसा आर्थिक फसवणूक करणारा अटकेत



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील इलेक्ट्रॉनिक्स दुकानात विक्रेत्याला, ऑन लाईन पेमेंट दिले, परंतू ऑनलाईन पेमेंटला देयक रक्कमेचा खोटया मेसेजने गंडवून ऑनलाईन पेमेंटची रक्कम मिळाली की नाही हे पहाताना ग्राहकांनी त्वरीत तेथून पोबारा केला व भर दिवसा इलेक्ट्रॉनिक्स वस्तू विक्रेत्याची आर्थिक फसवणूक करणारा आरोपीस रेवदंडा पोलिसांनी शिताफीने तपास करून अटक केली.

रेवदंडा बाजारपेठेत २ सप्टेबर २०२५ रोजी दुपारी २.४५ च्या सुमारास राहूल राजेंद्र जैन यांच्या मालकीच्या राहूल इलेक्ट्रानिक्स या दुकानात एका ग्राहकांनी सॅमकॉन कंपनीचा स्पिकर सेट ७५००/–रूपये किमंती मध्ये खरेदी केला.

यावेळी खरेदी केलेल्या वस्तूची रक्कम देण्यासाठी प्रथम भ्रमणध्वनली स्कॅनरवर खरेदी रक्कम देण्याचा बहाणा केला, गुगल पे व्दारे खरेदीची रक्कम पाठविली, त्या पाठविलेल्या रक्कमेचा मेसेज सुध्दा त्यांनी दुकानातील संगिता जैन यांना दाखविला, दरम्यान ग्राहकांनी पाठविलेली रक्कम अंकाउंट मध्ये जमा झाली नसल्याचे त्यांचे निदर्शनास आले. दरम्यान आर्थिक फसवणूक करणाऱ्या अज्ञाताने तेथून त्वरेने बाहेर ठेवलेल्या मोटर सायकलने पोबारा केला. या फसवणूक करणाऱ्यां अज्ञाताचे विरोधात इलेक्ट्रॉनिक्स दुकानदार संगिता राजेंद्र जैन यांनी रेवदंडा पोलिस ठाणे येथे आर्थिक फसवणूकीबाबत तक्रार अर्ज दिला होता.

या सिसिटिव्हीत मिळालेल्या फोटोच्या आधारे रेवदंडा पोलिसांनी त्वरीत तपास सुरू केला, यावेळी रोहा तालुक्यातील खैराळे येथील सचिन राजू सांळुखे यांस पोलिसांनी संशयाने ताब्यात घेतले, व तपास केला, व त्याचेवर रेवदंडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरिक्षक पवार हे सहा.पोलिस निरिक्षक श्रीकांत किरविले यांचे मार्गदर्शनाखाली करत आहेत.

# मुरूड समुद्रकिनारी वाहून आलेल्या १४९ मूर्तींचे श्रीसदस्यांनी केले पुन्हा विसर्जन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड ,राजपुरी, मजगाव व अन्य ठिकाणी जलौषात १० दिवसाचे गणेश मूर्तींचे विसर्जन सोहळा साजरा झाला पण विसर्जनाच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी मुरुड ,मजगाव ,राजपुरी ,एकदरा ,समुद्रकिनारी १४९ प्लास्टर ऑफ पॅरिस च्या गणेश मूर्ती वाहून आल्या सकाळी समुद्रला ओहोटी लागल्यावर किनारी वाहून आलेल्या गणेश मूर्तींचे ३४ डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे श्री सदस्यांनी पुन्हा खोल समुद्रात बोटीच्या साह्याने नेऊन विसर्जित केल्या.व नंतर संपूर्ण समुद्र किनारा स्वच्छ केला येणाऱ्या पर्यटकांना भग्न मूर्ती दिसू नये म्हणून पहाटे ६ वाजताच श्रीसदस्य किनार्यवर आले होते ,वाहुन आलेल्या मूर्तींना एकत्रित करून छोट्या बोटीतून खोल समुद्रात नेऊन पुन्हा विसर्जित करण्यात आल्या

अनेक मुरुडकरांची व श्रीसदस्यांची मागणीआहे कि मुरुड नगरपालिकेने प्लास्टर पॅरिसच्या मूर्ती विसर्जनासाठी समुद्रकिनारी कृत्रिम तलाव बनवण्यात यावेत तयामुळे भक्तांना स्वतः च्या हाताने आनंदाने मूर्ती विसर्जित करता येईल ,व शाडूच्या मुर्त्या समुद्रात विसर्जित कराव्या ,मुरुड परिसरात ५०० हुन जास्त प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती मागवणयत येतात .यावर अनेकवेळा बंदी घालूनदेखील मूर्ती येणं बंद झाले नाही म्हणून कृत्रिम तलाव हा उत्तम पर्याय आहे




# ईद-ए-मिलाद पेण शहरात जुलूसमध्ये एकात्मतेचे मनोमिलन

**पेण : प्रतिनिधी**

इस्लामचे धर्मगुरू मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस संपूर्ण जगात ईद मिलाद म्हणून साजरा करण्यात येतो. पेणमध्ये मुस्लिम समाजाच्या वतीने ५ सप्टेंबरला जुलूस काढण्यात आला होता.

ईद-ए-मिलाद निमित्त खान मोहल्ला येथे गुरुवार दिनांक ४ सप्टेंबर रोजी लहान मुलांचे नातं पठण, प्रवचन, कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते तसेच कसाई मोहल्ला येथे ५ सप्टेंबर रोजी मुलांच्या नातं पठण कार्यक्रम झाले यावेळी दोन्ही मुस्लिम मोहल्ल्यात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. स्नेहभोजनाचे आयोजन देखील करण्यात आले होते. सोमवारी ५ सप्टेंबर रोजी मौलाना हैदरअली यांच्या मार्गदर्शनाखाली



काढण्यात आलेल्या जुलूसमध्ये मौलाना अन्सार हजरत, मौलाना मन्सूर, मौलाना फुरकान, मौलाना जबीर हाफिज गुलजार आदींसह खान मोहल्ला, कसाई मोहल्ला, वडगाव, अंतोरे, वडखळ तसेच तालुक्यातून मुस्लिम बांधव, शांतता कमिटी सदस्य मोठ्या संख्येने सामील झाले होते.

यावेळी जुलूस खान मोहल्ला येथून निघून आझाद मोहल्ला, महावीर मार्ग, कसाई मोहल्ला येथून बाजारपेठ मार्गे पुन्हा खान मोहल्ल्यात येऊन जुलुसची सांगता करण्यात आली. यावेळी कुराणातील घोषणा देत, चाँद – तारा असलेले झेंडे घेऊन तसेच तिरंगा फडकावून लहान मुलांपासून ते वृद्धांच्या घोषणांनी परिसर दुमदुमले. या वेळी मिरवणुकीतील लोकांना सरबत व प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# गोव्यात मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या मजुराला माणगावकराने दिला माणुसकीचा हात

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

गोव्यातील मडगाव येथे निर्दयी मारहाणीचा बळी ठरलेला, गंभीर जखमी अवस्थेत असहाय्य मजूर यल्लाप्पा मुकींदा चव्हाण याला पत्रकार अरुण पवार यांनी केवळ मदतच केली नाही, तर सुखरूप लातूरला पोहोचवून मानवतेचे खरे दर्शन घडवले.

लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील यल्लाप्पा चव्हाण (वय ४५) हा पोटापाण्यासाठी गोव्याला गेला होता. मडगाव येथे मजूर म्हणून काम करीत असताना एका हॉटेलमध्ये जेवण घेताना त्याला काही मद्यधुंद तरुणांच्या टोळक्याने शुल्लक कारणावरून जबर मारहाण केली.या मारहाणीमध्ये त्याचे कान फाटले, डोक्याला व मस्तकाला गंभीर दुखापत झाली.



डॉक्टरांनी एकूण १४ टाके घालावे लागले. त्याशिवाय पोट, पाठ, छाती आणि अगदी गुप्तांगावरही जबरदस्त मार लागला होता. दात आणि जबड्याला सूज आल्याने त्याला नीट जेवता येत नव्हते.

त्याला अक्षरशः लुटून काढण्यात आले. मोबाईल, पैसे, आधारकार्ड, कपडे – सर्व काही हिसकावून घेतले गेले. जीव वाचविण्यासाठी तेथील पोलिसांनी हस्तक्षेप करून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. उपचार झाल्यावर दोन दिवसांनी त्याला एका टेम्पोत बसवून मुंबईकडे रवाना केले. मात्र वाटेत कसाबसा तो माणगाव येथे उतरला.

शनिवार, ६ सप्टेंबरच्या सकाळी हा जखमी आणि उपाशीपोटी मजूर माणगाव शहरातील मोरबा रोड परिसरात इकडेतिकडे भटकत होता. माझं इथे कोणी नाही. मला गावाला जायचं आहे. थोडी मदत करा अशा करुण हाकांनी लोकांचे हृदय पिळवटून निघत होते. ही आर्त विनंती ऐकून पत्रकार अरुण पवार थांबले. त्यांनी चौकशी केली असता संपूर्ण सत्य समोर आले. त्यावेळी यल्लाप्पाच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू, फाटके कपडे आणि जखमी अवस्थेतील अंगावर उठलेले व्रण – हे दृश्य हेलावून टाकणारे होते.

पत्रकार अरुण पवार यांनी यल्लाप्पाला चहा व नाश्ता दिला. त्यानंतर लातूरला जाण्यासाठी एक हजार रुपये, सोबत खाऊ व पाणी बांधून दिले. त्याला स्वतः च्या दुचाकीवर बसवून माणगाव एस.टी. बसस्थानकात नेले.तिथे पुण्याकडे जाणाऱ्या बसमध्ये बसवून कंडक्टरलाही विनंती केली की, हा इसम खूप आजारी आहे. लातूरपर्यंत पोहोचण्यास मदत करा. याचबरोबर स्वतःचा पत्ता व मोबाईल क्रमांक लिहून देत, प्रवासात काही अडचण आली तर मला लगेच फोन करा, असेही सांगितले.

या मदतीमुळे यल्लाप्पाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. साहेब तुमचं उपकार कधी विसरणार नाही. गावाला पोहोचल्यावर मी नक्की तुम्हाला फोन करीन असे म्हणत तो हुंदके देत होता. ही घटना माणगावकरांसाठी आणि समाजासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

## नॅशनल किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत

# पनवेलच्या खेळाडूंना सुवर्णपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चेन्नई येथे २७-३१ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या नॅशनल किक बॉक्सिंगचॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये पनवेलच्या खेळाडूंनी सुवर्ण कामगिरी केली.

अन्वी प्रशांत निकम हिने लाईट कॉन्टॅक्ट इव्हेंट व किक लाईट इव्हेंटमध्ये २१ किलो वजन गटात २ सुवर्ण पदक पटकावले आणि ईशान सुंदर कुंभार याने किक लाईट इव्हेंटमध्ये २१ किलो वजन गटात (७-९ वर्षे) वयोगटात कांस्यपदक पटकावले. तसेच प्रणव तुषार लब्दे याने या स्पर्धेत भाग घेतले होते.

प्रशिक्षक म्हणून योगेश नरेंद्र बैकर आणि रोहित काशीनाथ थळी होते. निलेश भोसले व मंदार पनवेलकर यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले त्याचे पुढील एशियन स्पर्धेमध्ये निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# थाई बॉक्सिंगमध्ये रायगडला तीन ‘सुवर्णां’सह आठ पदके

**कर्जत : प्रतिनिधी**

राष्ट्रीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी तीन सुवर्ण, तीन रौप्य व दोन कांस्य अशी एकूण आठ पदके मिळविली आहेत. यामध्ये दिशा शेळके, दिशांत भोईर आणि निसर्गा गवळी यांनी ‘सुवर्ण’ कामगिरी केली.



उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे राष्ट्रीय थाई बॉक्सिंग स्पर्धा झाली. या स्पर्धेसाठी कर्जतमधील तलवडे गावातील दिशा शेळकेची महाराष्ट्र संघात निवड झाली होती. दिशा १७ वर्षे व ५६ किलो वजनी गटात सुवर्णपदकाची मानकरी ठरली. ती वंजारपाडा येथील माथेरान व्हॅली स्कूल शाळेची विद्यार्थिनी आहे. दहावीच्या वर्गात शिकत असलेल्या दिशा हिची वयाच्या पंधराव्या वर्षीच आशियाई स्पर्धेत निवड झाली आहे. याशिवाय चांदई येथील तासगावकर इंजिनिअरिंग कॉलेजची विद्यार्थिनी निसर्गा गवळी तसेच दिशांत भोईर यानेही सुवर्णपदक प्राप्त केले. या तिघांनी रौप्यपदकही जिंकले. याशिवाय गायत्री डामसे व वैदेही जाधव यांनी कांस्यपदकाला गवणसी घातली.

या स्पर्धेसाठी स्थानिक आमदार आणि इंडिया थाई बॉक्सिंग फेडरेशनचे सर्वस्वी पाशा आतार व अनेक मान्यवर उपस्थित होते. रायगडच्या खेळाडूंनी महाराष्ट्र संघाला पदके मिळवून दिली.

रायगड जिल्हा थाई बॉक्सिंग अध्यक्ष स्वप्नील अडूरकर, सचिव मोहिनी अडूरकर यांच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंना आशियाई व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

# बॉडीबिल्डर सुभाष पुजारींची थायलंडमध्ये ‘सुवर्ण’पताका

**पनवेल : वार्ताहर**

५७वी एशियन बॉडी बिल्डिंग अँड फिजिक्स स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२५ थायलंडमधील बँकॉक या ठिकाणी झालेली. या स्पर्धेत सुभाष पुजारी, पोलीस निरीक्षक, नवी मुंबई यांनी सुवर्णपदक पटकाविले.
यासह त्यांनी नवी मुंबई व महाराष्ट्र पोलीस दलाचे तसेच देशाचे नाव उंचावून तिरंगा अभिमानाने फडकविला.

सुभाष पुजारी हे या स्पर्धेसाठी दररोज सहा तास मिस्टर ऑलिम्पिया सुनीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत होते. स्पर्धेत २६ देशातील ३४० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.
स्पर्धेसाठी पुजारी यांना मिलिंद भारंबे (पोलीस आयुक्त नवी मुंबई), श्रीकांत पाठक (सहपोलीस आयुक्त ठाणे शहर), प्रीती टिपरे (पोलीस अधीक्षक डायल ११२ नवी मुंबई), पत्नी रागिणी पुजारी, आनंद गुप्ता व विवेक गुप्ता (संचालक गॅम्प्रो ड्रिलिंग कंपनी खालापूर), राइनोमाइट क्लिनिक अंधेरीचे डॉ. कनिष्क जैन व डॉ. असीम माथन,सुदर्शन खेडकर ऋषी पेणकर यांचे विशेष सहकार्य लाभले.




या यशाबद्दल रश्मी शुक्ला (पोलीस महासंचालक), निखिल गुप्ता (अप्पर पोलीस महासंचालक), श्रीकृष्ण प्रकाश व गुप्ता (अप्पर पोलीस महासंचालक), अभिषेक त्रिमुखे (विशेष पोलीस महानिरीक्षक), मिलिंद भारंबे (पोलीस आयुक्त नवी मुंबई), पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी व सहकारी मित्र, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी पुजारी यांचे अभिनंदन केले.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन २३ ते २४ ऑगस्ट २०२५ रोजी या कालावधीत सिडको समाज मंदिर दुसरा मजला सेक्टर १८ नवीन पनवेल येथे महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली.




स्पर्धेचे वैशिष्ट्ये म्हणजे या स्पर्धेत दिव्यांग विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. उद्‌घाटन आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस प्रशिक्षक व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय सुदाम कडू यांच्या शुभहस्ते करण्यात आले. बक्षीस वितरण समारंभ मार्कंडेय उपाध्याय व पुष्पा उपाध्याय, विजय करकरे व संजय कडू यांच्या हस्ते करण्यात आले.

विजयी स्पर्धकांमध्ये बीगनर्स मुली : विजयी प्रियांशी डागर (अमेटी इंटरनॅशनल स्कूल), उपविजयी तन्वी घोळप (रायन इंटरनॅशनल स्कूल) ; बीगनर्स मुले : विजयी सुस्मित भिडे (सीपी गोयंका स्कूल), उपविजयी विहांत मंदार पुरोहित (डी पी एस स्कूल पनवेल); ११ वर्षाखालील मुले : विजयी अर्णव साळवकर (विसपुते स्कूल नवीन पनवेल), उपविजेतर आराध्य पाटील (पेण एज्युकेशन सोसायटी); ११ वर्षाखालील मुली : विजयी प्रियांसी डागर (अमेटी स्कूल), उपविजेती दक्षता मुजुमदार (रेड क्लिफ स्कूल उलवे); १३ वर्षाखालील मुली : विजयी श्रेया अशोक जानकर (सिकेटी स्कूल नवीन पनवेल), उपविजयी त्रिशा पावशे (डी ए व्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल); १३ वर्षाखाली मुले : विजयी आदित्य जोग (रॉयल इंटरनॅशनल स्कूल), उपविजेता प्राकेत गोयल (बालभारती पब्लिक स्कूल); १५ वर्षाखालील मुली : विजयी श्रेया अशोक जानकर (सिकेटी स्कूल नवीन पनवेल), उपविजेती त्रिशा पावशे (डी ए व्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल); १५ वर्षाखालील मुले : विजयी अद्वित गुप्ता (डी पी एस स्कूल नेरूळ), उपविजयी नील राठोड (महात्मा स्कूल खांदा कॉलनी)

तर १७ वर्षाखालील मुली : विजयी रुद्रा सरवणकर (सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल), उपविजयी श्रेया अशोक जानकर (सी के टी स्कूल); १७ वर्षा खालील मुले : विजयी अद्वित गुप्ता (डी पी एस स्कूल नेरूळ), उपविजयी निल राठोड (महात्मा स्कूल खांदा कॉलनी); १९ वर्षाखालील मुली : विजयी रुद्रा राजेश सरवणकर (सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल), उपविजेती श्रेया अशोक जानकर (सीकेटी स्कूल नवीन पनवेल); १९ वर्षाखालील मुले : विजयी अद्वित गुप्ता (डी पी एस स्कूल नेरूळ), उपविजेता समर्थ कुटे (एस एच एस अकॅडमी) ; महिला : विजयी रुद्रा सरवणकर (सेंट जोसेफ स्कूल न्यू पनवेल), उपविजेयी श्रेया अशोक जानकर (सी के टी स्कूल नवीन पनवेल); व्हेटरन पुरुष : विजयी अतुल देशमुख नवी मुंबई, उपविजेता प्रमोद कुमार नवीन पनवेल ; पुरुष : विजय पियांकुश बोस उलवे, उपविजेता सनित पाटील नवीन पनवेल, सेमी फायनल लिस्ट लोकेश पटवा, सेमी फायनल लिस्ट, मैत्रेय सचिन नाईक पनवेल.

या स्पर्धेचे चीफ रेफ्री शामल डेबार्मा यांनी अतिशय उत्तम रित्या काम केले आणि त्यामुळे स्पर्धा यशस्वी पार पडली.

# ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राला दुहेरी मुकुट

**चिपळूण : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तसेच भारत सरकार क्रीडा व युवा मंत्रालय यांच्या सूचनेनुसार राष्ट्रीय क्रीडा दिन व फिट इंडिया अभियान अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय रत्नागिरी व प्राचीन आणि स्वदेशी खेळ भारतीय लगोरी फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ९वी ज्युनिअर (एकोणीस वर्षाखालील) राष्ट्रीय लगोरी अजिंक्यपद स्पर्धा ही श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट सावर्डे, चिपळूण येथे भव्य दिव्य स्वरूपात पार पडली.




या स्पर्धेत भारतातील १० राज्यातून मुलांचे व मुलींचे संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन रत्नागिरी जिल्हा क्रीडा अधिकारी विजय शिंदे, भोजपुरी अभिनेता, फायटर मास्टर प्रिंस मिश्रा यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्राचीन आणि स्वदेशी खेळ भारतीय लगोरी फेडरेशनचे डायरेक्टर भरत प्रल्हाद गुरव, विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचलित स्पोर्ट्स ऍकॅडमीचे संचालक श्रीकांत पराडकर आदी उपस्थित होते.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण मुख्य अतिथी म्हणून भोजपुरी अभिनेता, फायटर मास्टर प्रिंस मिश्रा, श्रीकांत पराडकर, भरत गुरव, ॲम्युचअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष संदीप, सचिव ॲड.प्रिया गुरव, खजिनदार विजय लोणारे, बिझनेसमन अजित दळवी, विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचलित स्पोर्ट्स ॲकॅडमीचे प्रशिक्षक विनायक पवार व प्रतीक्षा पेंढारे, मुंबई लगोरी संघटनेचे सचिव राजेश शेठ यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. सहभागी सर्व राज्यांचे सामने हे रोमांचक व अटीतटीचे झाले. लगोरी टीम स्पर्धेत मुलांच्या गटात महाराष्ट्र संघाने सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपद मिळविले. उपविजेतेपद तेलंगणा संघाने पटकावले, तर तृतीय स्थान तामिळनाडू व कर्नाटक संघाला मिळाले.

मुलींमध्ये ही महाराष्ट्र संघाने सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपद मिळविले. उपविजेतेपद तेलंगणा संघाने मिळविले, तर तृतीय स्थान तेलंगणा व झारखंड संघाला मिळाले. मुलांमध्ये बेस्ट प्लेयर अवॉर्ड महाराष्ट्र मधील तन्मय पाटील याला, तर मुलींमध्ये तेलंगणा मधील एम. श्रावंती यांनी पटकावले. टार्गेट लगोरी प्रकारात मुलांच्या गटात झारखंड संघाला विजेतेपद, मध्य प्रदेश संघाला उपविजेतेपद, तर तृतीय स्थान दादरा-नगर हवेली व आंध्र प्रदेश संघाने मिळवले. मुलींच्या गटामध्ये मध्य प्रदेश संघाला विजेतेपद, तामिळनाडू संघाला उपविजेतेपद, तर तृतीय स्थान पाँडिचेरी व मुंबई संघाने पटकावले. सूत्रसंचालन रविंद्र जाधव यांनी केले. या स्पर्धेतून निवडलला मुले व मुलींचे संघ २३ ते२५ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लगोरी स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

# नमुंमपा जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये ९३ संघांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धांचे आयोजन क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने करण्यात आले असून या स्पर्धा ०४ सप्टेंबर रोजी फादर ग्नल, स्पोर्टस सेंटर, सेक्टर-१०, वाशी येथे अत्यंत उत्साहात झाल्या.



या स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षाआतील विविध शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांतून मुलांच्या गटात ६४ संघांनी आणि मुलींच्या गटात २९ संघांनी अशा एकूण ९३ संघांनी उत्फुर्तपणे सहभागी होत हा स्पर्धा उपक्रम यशस्वी केला. विशेष म्हणजे नवी मुंबई शहरातून आता टेबल टेनिस या खेळातही शाळांचा सहभाग वाढत असल्याचे समाधानकारक चित्र पुढे आले असून टेबल टेनिस मध्येही गुणवंत खेळाडू उदयास येत असल्याचे दिसून येत आहे.

या स्पर्धेचे आयोजन नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाकडून करण्यात येऊन स्पर्धा यशस्वीरित्या आयोजनाकरिता प्रमुख पंच गौरव फणसाळकर व त्याच्या सुहास चव्हाण यांचे विशेष सहयोग लाभले. या जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेत्या संघांना पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी शुभेच्छा प्रदान केल्या आहेत.

# आरडीसीएकडून १५ वर्षाखालील मुलींचे प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १५ वर्षाखालील मुलींचे प्रशिक्षण शिबिर कळंबोलीतील किशोर गोसावी यांच्या स्पोर्टी-गो क्रिकेट अकॅडमी येथे झाले. २३ ऑगस्ट व ४ सप्टेंबर अशा दोन दिवसीय क्रिकेट शिबिरात रायगड जिल्ह्याच्या संघामध्ये निवड झालेल्या २३ मुलींनी सहभाग घेतला.



प्रशिक्षण शिबिरात मुलींना फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण व यष्टिरक्षणाचे धडे तज्ज्ञ प्रशिक्षक नयन कट्टा, विनय पाटील, देवदत्त शास्त्री यांच्याकडून देण्यात आले. रायगडचा १५ वर्षाखालील मुलींचा संघ पुढील आठवड्यात पुणे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत सहभागी होणार असून स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी या शिबिराचे आयोजन आरडीसीएतर्फे करण्यात आले होते.

एमसीएतर्फे घेण्यात येणारी ही स्पर्धा एकदिवसीय व ३५ षटके अशा प्रकारची असून प्रथम साखळी फेरीचे सामने होतील. गतवर्षी रायगडच्या १५ वर्षाखालील मुलींच्या संघाने सुपर लीगपर्यंत मजल मारली होती. यंदादेखील मुलींचा क्रिकेट संघ चांगली कामगिरी करेल अशी अपेक्षा आहे. या संघाला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भालाफेकमध्ये अनुजा गोगरला रौप्यपदक



**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स असोसिएशनने राज्यस्तरीय ॲथलेटिक स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या राज्याच्या विविध भागातील स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये जिंदाल माध्यमिक विद्यालय, साळाव, ता. मुरूड येथे शिकणारी अनुजा देवानंद गोगर या विद्यार्थिनीने भालाफेकमध्ये रौप्यपदकावर जिंकले.

या यशाबद्दल आमदार महेंद्र दळवी यांनी अनुजाचे कौतुक केले तसेच तालुक्याचे गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ, गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, जिंदाल माध्यमिक विद्यालय साळावचे मुख्याध्यापक मुकेश ठाकूर, उपमुख्याध्यापक मंगेश बामनोटे, शिक्षक व कोर्लई ग्रामस्थांनी अनुजाचे अभिनंदन केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com